cmyk

## संपादकीय

### काँग्रेसने चाकोरी तोडली आता प्रदेशाध्यक्षांकडून अपेक्षा

आता रडायचे नाही तर लढायचे आहे असा स्पष्ट संदेश नवनियुक्त काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सामान्य कार्यकर्त्यांना दिला आहे. कार्यकर्ता कार्यकुशल बनवायचा आहे. आपण पुढील काळात राज्यात काँग्रेसचे संघटन मजबूत करण्यावर भर देणार असून काँग्रेसचा विचार घराघरांत पोहोचणार आहे. पुढील निवडणुकीत राज्यात काँग्रेसची सत्ता आणून काँग्रेसचा मुख्यमंत्री बनवायचा आहे, असा निर्धार हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३०० | शनिवार, दि.२२ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये







# तूर खरेदीचा मार्ग मोकळा

## साठवण्यासाठी आता खासगी गोदामे घेणार भाड्याने

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील वखार महामंडळाची गोदामे आधीच सोयाबीनने फुल झाली आहेत. त्यामुळे तूर कुठे साठवायची हा प्रश्न सरकारपुढे होता. त्यामुळेच राज्यात तुरीची खरेदी सुरु होण्यास उशीर झाला. पण आता वखार महामंडळाने राज्यातील खासगी गोदामे भाड्याने घेऊन तूर साठवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तूर खरेदीतील महत्वाचा प्रश्न निकाली निघाला आहे.**



राज्यात यंदा सोयाबीनची खरेदी ६ फेब्रुवारीपर्यंत चालली. पण सोयाबीनची खरेदी अपेक्षेपेक्षा जास्त झाल्याने सरकारचे साठवणुकीचे नियोजन बिघडले होते. त्यामुळे तुरीची खरेदी कधी सुरु करायची आणि तूर कोठे साठवायची? हा प्रश्न होता. राज्यात वखार महामंडळाच्या गोदामांची एकूण साठवण क्षमता १८ लाख टन आहे. पण सोयाबीनचीच खरेदी ११ लाख २१ हजार टन झाली. सोयाबीन खरेदीची मुदत संपल्यानंतरही या गोदामांमध्ये सोयाबीन साठवण्यासाठी आठवडाभर खरेदी केंद्रांना वाट पाहावी लागली. खरेदी केंद्रांच्या गोदामांमध्येही सोयाबीन पडून होते. त्यामुळे तूर खरेदीचा प्रश्न निर्माण झाला होता. तूर पट्ट्यात असलेल्या नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, लातूर विभागात खरेदी जास्त होणार आहे. पण सर्वच जिल्ह्यांमध्ये साठवणुकीचा ◀◀ पान २ वर

### साठवणुकिच्या अडचणीमुळे उशिराने खरेदी

दरवर्षी फेब्रुवारीच्या सुरुवातीला सुरु होणारी तूर खरेदी यंदा दोन आठवड्याने उशीरा सुरु झाली. त्याचे मुख्य कारण गोदामांची टंचाई हेच होते. पण तुरीचा बाजार कोसळल्याने सरकारला तूर खरेदी तातडीने सुरु करणे गरजेचे होते. त्यामुळे वखार महामंडळाने जिल्हानिहाय खासगी गोदामे भाड्याने घेतली आहेत. या गोदामांमध्ये २ लाख ९७ हजार टन तूर साठवण्याचे नियोजन केल्याचे वखार महामंडळाचे म्हणणे आहे.

## लाडकी बहिण योजना कधीही बंद होणार नाही–शिंदे

**गोंदिया । वृतसंस्था**



**लाडक्या बहिणींच्या विरोधात जाणाऱ्यांना माझ्या लाडक्या बहिणींनी जोडा दाखवला. ही योजना कधीही बंद केली जाणार नसल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींना दिला आहे. ते गोंदियात बोलत होते.**

ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. आतापर्यंत एकूण सात हाफ्ते लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आले आहेत. तसेच आता फेब्रुवारीचा हाफ्ता वितरणाला देखील सुरुवात झाल्याची माहिती समोर येत आहे. आतापर्यंत पाच लाख अपात्र महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. यावरून विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला, तसेच ही योजना बंद पडणार असल्याची देखील चर्चा सुरू झाली. यावर बोलताना आता उपमुख्यमंत्री ◀◀ पान २ वर

# मुंडे, कोकाटेंच्या राजीनाम्यासाठी अण्णा हजारे मैदानात

## फडणवीस, अजितदादांसमोर निर्णय घेण्याचे मोठे आव्हान







**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**आरोप झालेल्या मंत्र्यांनी स्वतःहून राजीनामा दिला पाहिजे, असे वक्तव्य करत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी महायुतीतील दोन मंत्र्यांवर निशाणा साधला आहे. मंत्रिमंडळात घेताना आधी विचार करणे गरजेचे असल्याचे म्हणत सरकारवरच अण्णा हजारे यांनी हल्लाबोल केला आहे. तर मंत्रिमंडळात राहून ज्यावेळी आरोप होतात, त्यावेळी एक क्षणसुद्धा त्या पदावर राहणे हा दोष असल्याचे अण्णा हजारे यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर निर्णय घेण्याचे मोठे आव्हान असणार आहे.**

मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा गेल्या दोन महिन्यापासून महायुतीसह मविआतील नेत्यांकडून मागितला जात आहे. मात्र अद्याप तरी सरकारकडून त्यांना अभय मिळाले आहे. तर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना एका गुन्ह्यामध्ये न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा सुनावल्यामुळे त्यांच्या सुध्दा राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. आता जेष्ठ समाजसेवक अण्णा हजार हे सुध्दा वयाच्या ८७ व्या वर्षी मुंडे आणि कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी मैदानात उतरले आहेत. ते म्हणाले, मंत्रिमंडळात असताना आरोप झाल्यावर एक क्षणसुद्धा पदावर राहू नये. लगेच राजीनामा दिला पाहिजे. आरोप होताच मंत्र्यांनी प्रथम राजीनामा देवून बाहेर पडले पाहिजे, असे सांगत अण्णा हजारे यांनी मंत्री धनंजय मुंडे आणि मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर निशाणा साधला आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मंत्री ◀◀ पान २ वर

### अण्णांच्या मागणीची सरकार दखल घेणार का?

आतापर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा आ. सुरेश धस, आ. संदिप क्षीरसागर, आ. प्रकाश सोळंके, आ. जितेंद्र आव्हाड, आ. अंबादास दानवे, अंजली दमानिया यांनी मागितला आहे. मात्र अजूनही त्यांच्या मागणीला सरकारने किंमत दिली नाही. आता अण्णा हजारे यांनी मुंडे आणि कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली असल्याने फडणवीस आणि अजितदादा नेमका निर्णय काय घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जालन्यात दहावीचा पेपर फुटला!

जालना । प्रतिनिधी

दहावीच्या परिक्षेला शुक्रवारपासून सुरूवात झाली असून पहिल्याच दिवशी पेपरफुटीची घटना समोर आली आहे. जालना जिल्ह्यातील बदनापूर येथे फुटल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संपूर्ण राज्यामध्ये शुक्रवारपासून दहावीच्या बोर्डाची परीक्षा सुरू झाली आहे. शुक्रवारी मराठीचा पहिला पेपर होता. सकाळी ११ वाजता परीक्षेला सुरुवात झाल्यानंतर अवघ्या पंधरा ते वीस मिनिटांमध्ये जालना जिल्ह्यातील बदनापूर येथे दहावीच्या मराठीची प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्राच्या बाहेर आली. त्यामुळे बदनापूर येथील झेरॉक्स सेंटरवर थेट उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स मारून विद्यार्थ्यांना कॉपी पुरवण्याचा प्रकार समोर आला आहे. ◀◀ पान २ वर

# धनंजय मुंडेंना संतोष देशमुख प्रकरणात सहआरोपी करा

## मनोज जरांगे यांची मागणी; मस्साजोग येथे देशमुख कुटुंबाची घेतली भेट

**केज । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची मस्साजोग येथे भेट घेऊन सांत्वन केले. यानंतर त्यांनी धनंजय मुंडेंवर जोरदार हल्लाबोल केला. संतोष देशमुख प्रकरणात धनंजय मुंडेंना सहआरोपी करा, ◀◀ पान २ वर



### नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे?

चार्जशीटमध्ये छेडछाड होण्याची शक्यता आहे. धनंजय मुंडे देखील यात आहे. टोळ्या सांभाळण्याचा त्यांना नाद आहे. यातील आरोपी त्यांचेच आहे त्यामुळे त्यांना सह आरोपी करा, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना संतोष देशमुख प्रकरणात सह आरोपी करा, अशी मागणी केली. तर सरकारला माहित आहे की यात धनंजय मुंडे यांचा हात आहे, असा दावा देखील मनोज जरांगे पाटील यांनी केला.

# माझी हिसकावली, पण पंतप्रधानांना आम्ही खुर्ची देणार

## • सुधीर मुनगंटीवार; मंत्रीपद हुकल्याने पुन्हा खदखद बाहेर



**चंद्रपुर । प्रतिनिधी**

**भाजप नेते आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांची खदखद पुन्हा एकदा बाहेर आल्याचे पाहायला मिळाले. मेरी कुर्सी छिनी गई, अशी खंत व्यक्त करीत येत्या सहा महिन्यात पंतप्रधानांना खुर्चीच आम्ही देणार असल्याचे वक्तव्य माजी मंत्री सुधीर मुनंगटीवार यांनी केले. ते चंद्रपूर येथील एका कार्यक्रमात बोलत होते.**

चंद्रपूर येथे फ्लाईंग क्लबच्या उद्धाटन कार्यक्रमात सुधीर मुनंगटीवार बोलत होते. या वक्तव्यावरून मंत्रिपद न मिळाल्याने सुधीर ◀◀ पान २ वर

## आदित्य जीवने यांच्याकडून दहावीच्या परिक्षा केंद्रांना भेटी: एका विद्यार्थ्याला केले रेस्ट तिकीट

**बीड । प्रतिनिधी**

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी दहावी शालांत प्रमाणपत्र परीक्षा दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ पासून बीड जिल्ह्यात सुरू असून शुक्रवारी मराठीच्या पहिल्याच पेपरला बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी बीड शहरातील विविध केंद्रांना भेट देऊन मराठी विषयाचे पेपर ला कॉपी करताना एका विद्यार्थ्याला रेस्ट तिकीट केले आहे .**

आज पासून बीड जिल्ह्यातील १५६ केंद्रावर इयत्ता दहावीचा मराठी विषयाचा पेपर होता.मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी बीड शहरातील शिवजी माध्यमिक विद्यालय, बीड येथे सर्व प्रथम भेट दिली भेटीच्या वेळी केंद्रावर अनियमितता दिसून आली.तर केंद्र संचालक याच्यावर कारवाई चे निर्देश देण्यात आले. भगवान विद्यालय बीड येथे भेट दिली असता , खिडक्याचे तावदाने व परीक्षा केंद्राबाहेरील त्रास,गर्दी कमी ◀◀ पान २ वर

**एकूण परिक्षार्थी:–३७०८८**
**उपस्थित:–३६३२७**
**अनुपस्थित:–७६१**

# रिचार्ज वाल्या ताईंच्या खात्यावर २५ खोक्यांचा टाकलाय बॅलन्स, लवकरच देणार पुरावे

## सूरज चव्हाणांचे ट्विट अन् अंजली दमानिया यांचा त्रागा अन् आकांड तांडव

**मुंबई । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करण्यासाठी रिचार्ज वाल्या ताईच्या खात्यावर २५ खोक्यांचा बॅलन्स टाकण्यात आला आहे. काही काम न करता वर्षाला १५ देश फिरणाऱ्या व अडीच कोटी टॅक्स भरणाऱ्या स्वयंघोषित समाजसेविका ताई, तुमचा रिचार्ज कुणाच्या माध्यमातून झाला आहे ते लवकरच पुराव्यासहित उघड करणार, असे ट्विट केल्यानंतर हे ट्विट स्वतःवर ओढून घेत तथाकथित समाजसेविका अंजली दमानिया यांनी प्रचंड त्रागा करत सोशल मीडियावर संताप व्यक्त करून आकांड तांडव केल्याचे दिसत आहे.**

सुरज चव्हाण यांच्या या ट्विट नंतर अंजली दमाने यांनी मला प्रचंड राग आला असल्याचे म्हटले असून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी माजी सर्व बँक खाते तपासावी व त्यावर कुठलीही बेहिशोबी दमडी तरी आहे का हे तपासावे. मी लढते म्हणून माझा छळ करणार आहात का असा सवाल उपस्थित केला आहे. मात्र यावेळी नेट ◀◀ पान २ वर

## बाजारभाव


कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| वाण (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५३.०० क्विंटल | २,८०० | ३,४०१ | ३,१४२ |
| ज्वारी/हायब्रिड: ९९.५० क्विंटल | २,०५० | २,९३० | २,४०१ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : १८.५० क्विंटल | ७,१०० | ७,३७५ | ७,२२१ |
| उडीद : ८.५० क्विंटल | ५,३०० | ५,५०० | ५,४३३ |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,५५० | ३,१४१ | २,९०० |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ५७.५० क्विंटल | ३,९९१ | ४,०३१ | ४,००८ |
| हरभरा: ३४.०० क्विंटल | ५,०९२ | ७,५५० | ५,६५९ |

# भक्ती, शक्ती अन् युक्ती हे मराठी भाषेचे सामर्थ्य !

## नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार, ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

मराठी भाषेमध्ये जशी शूरता आहे तशी विरताही आहे, संवेदनाही आहे आणि सहवेदनाही आहे म्हणूनच भक्ति शक्ती युक्ती हे मराठी सामर्थ्य आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. ज्ञानेश्वर तुकारमांचे स्मरण करुन त्यांनी दिल्ली मराठी भाषेला अभिवादन करत असल्याचे म्हटले. अखिल भारतीय साहित्य संमेलन हे एका राज्यापूरते मर्यादित ◀◀ पान २ वर

### “ डॉ.तारा भवाळकर यांची मोदी यांच्यावर नाव न घेता टीका

माझा जन्म जैविक नाही वगैरे म्हणणाऱ्यांवर किती विश्वास ठेवायचा असा सवाल करत संमेलाध्यक्ष डॉ.तारा भवाळकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव न घेता खोचक शब्दात टीका केली. अध्यक्षीय भाषणात बोलताना त्यानी टीका केली. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर एका मुलाखतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माझा जन्म जैविक पद्धतीने झाला असे वाटत नाही, तर मला परमात्माने पाठवले असून आज जे काही घडत आहे ते त्या परमात्म्याकडून माझ्या हातून घडविले जात आहे, असे म्हटले होते. तो धागा पकडून डॉ.तारा भवाळकर यांनी आपले विचार मांडले.



### “ मराठी माणसांचा अटकेपार झेंडा –स्वागताध्यक्ष शरद पवार



मराठी माणसाने अटकेपार झेंडा फडकवला आहे. मराठी संमेलन देशाच्या राजधानीत दुसऱ्यांदा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहिले याचा आनंद आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी मोदींनी जी भूमिका घेतली ती महत्वाची आहे. मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले होते. त्यानंतर आता दिल्लीतील ७० वर्षानंतर या संमेलनाची पुनरावृत्ती होत आहे. नरेंद्र मोदी यांना आमंत्रण दिल्यानंतर त्यांनी लगेच होकार दिला. मला गुरूस्थानी असलेले यशवंतराव चव्हाण उत्तम साहित्यिक होते, त्यामुळे मी सुद्धा उत्तम लिहिता झालो. इतकी संमेलने झाली, मात्र केवळ चार महिलांनाच संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले. तारा भवाळकर यांना संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हे आनंददायी आहे. दिल्ली आणि महाराष्ट्राचे एक नाते आहे. महाराष्ट्र आणि दिल्लीचे राजकीय आणि सांस्कृतिक संबंध आहेत असे शरद पवार यांनी म्हटले. यावेळी बोलताना शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले.

cmyk

## अग्रलेख

# काँग्रेसने चाकोरी तोडली आता प्रदेशाध्यक्षांकडून अपेक्षा

आता रडायचे नाही तर लढायचे आहे असा स्पष्ट संदेश नवनियुक्त काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सामान्य कार्यकर्त्यांना दिला आहे. कार्यकर्ता कार्यकुशल बनवायचा आहे. आपण पुढील काळात राज्यात काँग्रेसचे संघटन मजबूत करण्यावर भर देणार असून काँग्रेसचा विचार घराघरांत पोहोचणार आहे. पुढील निवडणुकीत राज्यात काँग्रेसची सत्ता आणून काँग्रेसचा मुख्यमंत्री बनवायचा आहे, असा निर्धार हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जनतेने जबरदस्त धक्का दिला. या पराभवानंतर काँग्रेसने प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना हटवून बुलडाण्यातील काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी टाकली आहे. त्यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाचे बळकटीकरण होईल आणि महाराष्ट्रात काँग्रेस पुन्हा एकदा भरारी घेईल असा विश्वास काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मोठा विजय मिळवला पण विधानसभेत मात्र काँग्रेसला अपयश आले. आता पुन्हा जोमाने काम करावे लागणार आहे. संख्याबळ महत्त्वाचे नाही तर लढण्याची इच्छाशक्ती असावी लागते. बऱ्याच चर्चेनंतर काँग्रेसने अखेर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला नवीन अध्यक्ष दिला. बुलडाणा जिल्ह्यातील माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची या पदावर नियुक्ती झाली. या नियुक्तीनंतर काँग्रेसच्या गोटात संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्या.


काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी या नियुक्तीवर आश्चर्य व्यक्त केले. पण काँग्रेसने पहिल्यांदाच एक नवीन प्रयोग करताना पहिल्यापासून निष्ठा असलेला आणि गावपातळीपासून काम करीत वरच्या पातळीवर पोहोचलेला नेता या पदावर नेमला. काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष हा प्रस्थापित घराण्यापैकीच असला पाहिजे अथवा तो साखरसम्राट, सहकार सम्राटच असला पाहिजे असा जो पूर्वापार चालत आलेला संकेत होता त्याला काँग्रेसश्रेष्ठींनी फाटा देऊन एका नव्या चेहऱ्याला संधी दिली. या नियुक्तीचे काँग्रेस संघटनेतून जोरदार स्वागत व्हायला हवे होते. परंतु दुर्दैवाने तसे दिसले नाही. काँग्रेसच्या सद्यस्थितीला काँग्रेसची मूलभूत धोरणेच कारणीभूत आहेत असा आरोप नेहमीच केला जातो. काँग्रेस हा घराणेशाही जोपासणारा, स्थितीवादी आणि नेमस्त राजकारण करणारा पक्ष आहे, या पक्षाला चाकोरीबाहेरचे निर्णय लगेच मान्य होत नाहीत अशी कारणे काँग्रेसच्या सद्यस्थितीबाबत दिली जातात. या पार्श्वभूमीवर काँग्रेसश्रेष्ठींनी हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती करून एक वेगळी वाट चोखाळल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे. काँग्रेसचा सर्वपरिचित असलेला आक्रमक नेता हवा होता असे काही जणांचे म्हणणे होते. त्या तुलनेत सपकाळ हे अगदीच नवखे आहेत असे काहींचे म्हणणे होते पण सपकाळ हे तरुण वयापासून काँग्रेस संघटनेशी जोडले गेलेले आहेत. ते राज्यस्तरीय कबड्डीपटू आहेत. एनएसआय या विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून त्यांनी काँग्रेसचे कार्य करण्यास सुरुवात केली. बुलडाणा जिल्ह्यात तरुण वयात ते सरपंच झाले. वयाच्या २७ व्या वर्षी जिल्हा परिषद अध्यक्ष बनले. २०१४ ला ते आमदार म्हणून निवडून आले. एआयसीचे ते सेक्रेटरी होते. त्यांनी काँग्रेसच्या वतीने गुजरात आणि मध्य प्रदेशात संघटनात्मक काम केले आहे. राष्ट्रीय स्तरावर राजीव गांधी पंचायतराज संघटनेचे प्रमुख म्हणूनही त्यांनी काम केले आहे. त्यांची ही सारी कारकीर्द पाहता ते नवखे आहेत असे कसे म्हणता येईल? ग्रामीण भागात आणि आदिवासींमध्ये त्यांनी मोठ्या प्रमाणात काम केले आहे. आचार्य विनोबा भावे यांच्या सर्वोदय चळवळीचे पहिल्यापासून काम करणारे ते कार्यकर्ते आहेत. चाकोरीबाहेरचा एक नवीन अध्यक्ष दिल्याने काँग्रेस संघटनेत नवचैतन्य निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. प्रदेशाध्यक्षपदासाठी पृथ्वीराज चव्हाण, विश्वजीत कदम, सतेज पाटील, अमित देशमुख यांच्या नावांचीही चर्चा होती. आजच्या अवघड परिस्थितीत काँग्रेसश्रेष्ठींनी चाकोरीबाहेरचा विचार करून तळागाळातून वर आलेल्या एका आश्वासक चेहऱ्याला संधी दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ या संधीचे सोने करतील अशी अपेक्षा आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण २० लक्ष घरकुल मंजूरी पत्राचे वितरण

### १० लक्ष लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण-रावसाहेब दानवे

**जालना । पतिनिधी**

**अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री, यांच्या हस्ते व देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, यांचे उपस्थितीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा २ अंतर्गत २० लक्ष घरकुल लाभार्थ्यांना मंजूरी पत्राचे वितरण आणि १० लक्ष घरकुल लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती माजी मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी एका पत्रकाद्वारे माहिती दिली आहे.**



महा आवास अभियान २०२४-२५ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ मधील राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजूरी पत्र व किमान १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण कार्यक्रम दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ४.३५ वाजता, मुख्य बॅडमिंटन हॉल, श्री शिव छत्रपती क्रिडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री अजित पवार, उप मुख्यमंत्री (अर्थ), मा. ना. चंद्रकांत पाटील मंत्री, दत्तात्रय भरणे, मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री, जयकुमार गोरे, मंत्री ग्रामविकास व पंचायतराज, मा. ना. डॉ. निलम गो-हे, उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, मा. ना. श्री. योगेश कदम, राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायतराज, मा. ना. श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री, नगर विकास व सामाजिक न्याय, मा. श्रीमती सुजाता सौनिक (भा.प्र.से) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य व मा. श्री. एकनाथ डवले, प्रधानसचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग उपस्थित राहणार आहेत.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी-गणेश महाडिक

**जालना । प्रतिनिधी**



जिल्ह्यात इयत्ता दहावी व बारावीच्या शैक्षणिक परीक्षा सुरु आहेत. तसेच आगामी महाशिवरात्री, रमजान या सण, उत्सव आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.६ मार्च २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. ६ मार्च २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## अंबड बसस्थानकात बस घुसून दोघांचा मृत्यू,६ जखमी

**जालना । प्रतिनिधी**

अंबड बस स्थानक मध्ये बसचे ब्रिक फेल झाल्याने बस अचानक बस स्थानक मध्ये घसून या अपघातात सहा जण जखमी तर दोघांचा मृत्यू झाला याप्रकरणी घटनेची माहिती समजतात बस आगाराचे जिल्हा नियंत्रण अधिकारी श्रीमती सपकाळ यांनी अंबड येथे जाऊन घटनेची व जखमींची पाहणी केली व तसेच जखमींना व मृत्यू यांना तत्काळ मदत देण्याचे आदेश देण्यात आले. तसेच सदरील बस अंबड डेपो ची होती सदरील बस अंबड सिल्लोड जाणारी होती जखमीचे नाव श्रीमती. पारूबाई धोंडूपंत वय ४५ वर्षे श्री. रिहान अलीम शेख वय १.५ वर्षे श्रीमती. हिना अलीम शेख वय २६ वर्षे श्रीमती. पुजा कडूबा धोत्रे वय ०४ वर्षे श्रीमती. रेखा कडूबा धोत्रे वय ३५ वर्षे श्रीमती. अनिता बंडू गुंजाळ वय ३०, मयत यांचे नाव श्री. मुरलीधर काळे वय ६० वर्षे श्री. खलील उल्ला अजीम उल्ला ७५ वर्षे सदरील घटनेमध्ये कर्तव्यावरील रा.प चालक चुकीमुळे दुर्घटना घडली बस क्रमांक २० १६०६ चालक विजय शेषेराव राठोड बि.क्र.१३८४७१९/३३२, वाहक कृष्णा



शामराव गायकवाड बि.क्र- २७४७/२१८०६ सदरील घटना दिनांक २१/०२/२०२५ रोजी १३.३० च्या सुमारास बस क्रमांक २० - १६०६ ही अंबड ते सिल्लोड या मार्गावर जाण्यासाठी अंबड बस स्थानकावर बस स्थानक प्लॅटफॉर्म दोन वर लावत असताना चालकाचे रा.प. बस वरील नियंत्रण सुटल्याने रा. प. बस प्लॅटफॉर्म चार वर चढली व प्लॅटफॉर्मवर असणाऱ्या प्रवासी यांना धडकून खाली बसलेले प्रवासी जखमी झाले यामध्ये दोघांचा मृत्यू झाला.

## महात्मा फुले चौक येथे शिवजयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

शहरा पासुन जवळच आसणा-या मौजे फुलेपिंपळगाव रोड केसापुरी वसाहत येथील महात्मा फुले चौक येथे सातत्यान मानवी कल्याणासाठी झटणा-या महापुरूषांच्या जयंत्या,विविध सामाजीक कार्यक्रम घेऊन साज-या केल्या जातात याचाच एक भाग म्हणुन दि १९ फेब्रुवारी बुधवार रोजी बहुजन प्रतिपालक,रयतेचाराजा,छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या ठिकाणी सेवा सहकारी सोसायटी चे व्हाईस चेअरमन सर्जेराव खामकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व शिवजयंतीचे जनक राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले तसेच शिवाजी महाराजांच्या जयघोषात फटाक्यांची आतिष बाजी करूण अभिवादन करण्यात आले यावेळी फुले पिंपळगावचे माजी सरपंच दशरथ उंबरे,अभिमन्यू साळवे,एकता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे,भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे,साईं भक्ती ट्रव्हल्सचे मालक विलास सामाले,सदधम्म सेवासंघाचे सोपान उजगरे,राष्ट्रीय समाज पक्षाचे तालुका अध्यक्ष मुक्तीराम आबुज, भारतीय बौद्ध महासभेचे तालुका सचिव दयानंद साळवे,श्री कृपा टी हाउसचे सचिन ससाने , सौभाग्य मंगल कार्यालयाचे मालक संतोष कोरडे,संतोष मात्रे,रांजवण पाटील, गावडे,सुनिल उगले,गावातील प्रतिष्ठीत नागरीक संपत साळवे,नाना उंबरे,श्रिराम उंबरे,,विलास उंबरे केतन सामाले, प्रमोद उंबरे,सह गावातीतील नागरीक उपास्तीत होते.

# माणिकराव कोकाटे यांची आमदारकी रद्द करा

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना फसवणूक प्रकरणी न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा ठोठावल्यानंतर त्यांनी तात्काळ राजीनामा द्यायला हवा होता किंवा सरकारने त्यांचा राजीनामा घ्यायला हवा होता, पण तसे झाले नाही. आता महामहिम राज्यपाल यांनीच याप्रकरणात लक्ष घालून माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा व त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.**

महाराष्ट्र एसटी कामगार काँग्रेसने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भेट दिली, त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर मानहानीच्या एका बोगस प्रकरणात न्यायालयाने शिक्षा ठोठावली असता सचिवालयाने



अर्ध्यारात्रीच त्यांची खासदारकी रद्द केली, त्यानंतर त्यांचे शासकीय घरही सोडण्यास भाग पाडले तसेच काँग्रेसचे नेते व माजी मंत्री सुनिल केदार यांना न्यायालयाने शिक्षा ठोठावताच त्यांची आमदारकी तात्काळ रद्द करण्यात आली, पण माणिकराव कोकाटे यांच्याबाबतीत वेगळा न्याय आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांसाठी वेगळा न्याय कसा, असा सवाल करत कोकाटे प्रकरणात सरकार लोकशाही पद्धतीने वागत नाही असा आरोपही यावेळी त्यांनी केला. महाराष्ट्र एसटी काँग्रेसच्या रक्तदान शिबीरात बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, एसटी ही महाराष्ट्राची जीवनवाहिनी आहे, ग्रामीण भागात एसटी सेवेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे, ही सेवा चालू राहिली पाहिजे. एसटीमध्ये ज्या सवलती दिल्या जातात त्याचा पैसा राज्य सरकारने एसटी महामंडळाला दिला पाहिजे. एसटी कामगारांच्या वतीने रक्तादानासारखे महत्वाचे कार्य वर्षानुवर्षे सुरु आहे हे कौतुकास्पद आहे असेही सपकाळ म्हणाले. महाराष्ट्र एसटी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमाला राज्यभरातून आलेले एसटी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

### “ मावळे आणि संघ स्वयंसेवकांची तुलनाच होऊ शकत नाही

गोविंदगिरी महाराजांच्या विधानावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आणि संघ स्वयंसेवक यांची तुलनाच होऊ शकत नाही. हा महाराजांचा आणि मावळ्यांचा अपमान करण्याचा प्रयत्न आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकेला विरोध करणारा विचार हा संघाच्या विचाराशी मिळता जुळता आहे. शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या शौर्याबद्दल अफवा पसरवण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. मावळ्यांचा विषय जातीच्या पलीकडचा आहे, ते कोणत्या जाती धर्माचे नव्हते तर स्वराज्याच्यासाठी लढणारे छत्रपतींचे सैन्य होते. हेच गोविंदगिरी देवेंद्र फडणवीस यांना छत्रपती शिवाजी महाराजांना जिरेटोप घालून त्यांना महाराज बनवण्याचा प्रयत्न करत होते. जिरेटोप हे शिवाजी महाराजांचे प्रतिक आहे ते सुद्धा आरएसएस बळकावू पहात आहे, अशी टीकाही त्यांनी केली.



## बहुजनांच्या सोबतीने शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली-डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**तीनशे वर्षापूर्वी छत्रपती शिवरायांनी कोणत्याही जाती धर्माचा द्वेष न करता, सर्वांना समान सामाजिक न्यायाच्या हेतूने,वंचित, अपेक्षित समूहांना सोबत घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ उभारली.असे प्रतिपादन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.**

पुढे बोलताना डॉ.क्षीरसागर म्हणाले की,अठरा पगड जातींच्या मावळयांना सोबत घेत छत्रपती शिवरायांनी या स्वराज्याचे तोरण बांधून रयतेच्या मनात सुशासनाचा आदर्श निर्माण केला.यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लेझीम संचलन करून छत्रपती शिवरायांची भव्य मिरवणूक काढली, पोवाडा, नाट्य, पाळणा, यासह विविध दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी संसदेच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल,उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर,उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर यांनी केले. सूत्रसंचालन समन्वयक डॉ.पूनम शिंदे यांनी केले. तर आभार प्रदर्शन रमेश थोरात यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ.शेख अतीक, डॉ.शेख जफर,डॉ मीना हंगे,डॉ.सुनील जायभाये डॉ.अजय कुलकर्णी, डॉ.राजेश कुलकर्णी डॉ.वैभव शाहापुरे,डॉ.नवाज शेख,एकनाथ टपाळे,नायब खान,अमन खान,रमेश थोरात,यांचे सह कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १वरून...

### तूर खरेदीचा

प्रश्न निकाली निघाला असेही म्हणता येणार नाही. तूर खरेदी जशी वाढेल तसे साठवणुकीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे सांगण्यात येत आहे. राज्य सरकारने १३ फेब्रुवारीपासून तूर खरेदीला परवानगी दिली. राज्यात ३१५ खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली, पण खरेदीला अजून वेग आलेला नाही. मार्च महिन्यात तुरीच्या खेरदीला वेग येऊ शकतो. त्यावेळी साठवणुकीची समस्या आली नाही तर यंदा चांगली तूर खरेदी होऊ शकते.

-----------

### मुंडे, कोकाटेंच्या राजीनाम्यासाठी

धनंजय मुंडे यांच्यावर मंत्रिमंडळातून बाहेर पडण्यासाठी अर्थात मंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी दबाव टाकला जात आहे. तर दुसरीकडे माणिकराव कोकाटे यांना देखील न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. अशातच राज्यातील मंत्र्यांवर बोलताना अण्णा हजारे यांनी नाव न घेता माणिकराव कोकाटे आणि धनंजय मुंडेवर भाष्य केले आहे.

----------

### लाडकी बहिण योजना

एकनाथ शिंदे यांनी मोठी अपडेट दिली आहे. लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. लाडक्या बहिणींच्या विरोधात जाणाऱ्यांना माझ्या लाडक्या बहिणींनी जोडा दाखवला, असा हल्लाबोलही त्यांनी यावेळी केला आहे.

------------

### माझी हिसकावली, पण पंतप्रधानांना

मुनंगटीवार अद्याप नाराज असल्याचे दिसतंय. तर मंत्रिपद न मिळाल्याची सल सुधीर मुनंगटीवार यांच्या मनात अद्याप कायम आहे का? अशी सवाल सध्या चर्चेचा विषय ठरतोय. चंद्रपूर येथे भाजप नेते राजीव प्रताप रूडींच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या फ्लाईंग क्लबच्या उद्घाटनानिमित्ताने झालेल्या जाहीर कार्यक्रमात सुधीर मुनंगटीवार यांनी मंत्रीपद न मिळाल्याची खंत व्यक्त केली, तर माझी खुर्ची गेली पण पंतप्रधान ज्या खुर्चीवर बसतात ती खुर्ची येत्या सहा महिन्यात माझ्या मतदारसंघातून बनवून दिली जाणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, सुधीर मुनंगटीवारांच्या नाराजीवर जितेंद्र आव्हाड यांनी भाष्य करत कोणी खुर्ची घेतली हे त्यांनी सांगाव, आम्हाला काय माहीत त्यांची खुर्ची कधी कोणी घेतली. आम्ही थोडी आत्मज्ञानी आहोत, महाराष्ट्राला सांगा कोणी तुमची खुर्ची खेचली? असे म्हणत जितेंद्र आव्हाडांनी सुधीर भाऊंना खोचक सवाल केला.

-----------

### धनंजय मुंडेंना संतोष देशमुख

अशी मागणी देखील मनोज जरांगेंनी केली आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, राज्य सरकार बदनामीच्या दिशेने चालले आहे. संतोष देशमुख यांची क्रूर हत्या झाली आहे. विनाकारण वेठीस धरले जात आहे. तपास यंत्रणा किती स्ट्रॉन्ग आहे ते यावरून कळत आहे. वाल्मिक कराड ज्या गाडीतून शरण गेला ती गाडी पोलिसांनी झाकून ठेवली. प्रशांत महाजन या पोलीस अधिकाऱ्याला सह आरोपी केले नाही, त्यांना सर्वात जास्त यातील माहिती आहे. यातील कोणत्याच आरोपींना सह आरोपी केले नाही. शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षकांना देखील सह आरोपी करा. त्यांनी आंदोलन दडपले होते. या ठिकाणी पोलिसांकडून कारवाई होत नाही, असे त्यांनी म्हटले. पोलीस अधिकारी प्रशांत महाजन सुद्धा संतोष देशमुख यांच्या हत्येला जबाबदार आहे. आरक्षणाच्या बाबत, संतोष भैय्याच्या बाबत किंवा सूर्यवंशी कुटुंबाच्या बाबत न्याय मिळाला नाही तर मी शांत बसत नाही, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केला.

-----------

### जालन्यात दहावीचा

त्यामुळे आता बोर्ड दहावीचा पेपर रद्द करणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने दहावीच्या बोर्ड परीक्षेला सुरुवात झाली आहे. राज्यभरात १६ लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षेला बसले आहेत. परीक्षा केंद्रांवर कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. मात्र अशातच ही घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

-------------

### रिचार्ज वाल्या ताईंच्या खात्यावर २५ खोक्यांचा

कऱ्यांनी मात्र अंजली दमानिया यांना चांगलेच धारेवर धरल्याचे दिसत आहे. काहीही व्यवसाय न करणाऱ्या अंजली दमानिया वर्षाला अडीच कोटी टॅक्स कसा काय भरू शकतात असा प्रश्न काहींनी उपस्थित केलाय. तर विविध नेतेमंडळींवर बिनबुडाचे व निराधार आरोग्यच उत्पन्न करणाऱ्या अंजली दमान्यांवर एक आरोप झाला तर इतकी मिरची लागण्याचे काय कारण असाही सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे. काही जणांनी आपण अंजली दमानिया यांच्या पाठीशी असल्याचे बोलले आहे तर, सुरज चव्हाण यांनी आपल्या ट्विटमध्ये कोणाचेही नाव घेतले नव्हते मात्र तरी ते ट्विट अंजली दमानिया यांना बरोबर लागले. याचाच अर्थ रिचार्ज वाल्या ताई कोण ते महाराष्ट्राला कळले असेही मत अनेकांनी व्यक्त केले आहे. दरम्यान अंजली दमानिया ह्या केवळ प्रसिद्धीसाठी आरोप करून एखाद्या प्रकरणांमध्ये एन्ट्री घेतात, त्यानंतर त्यांचे हेतू साध्य झाले की त्या प्रकरणातून गुपचूप एक्झिट घेतात आणि नंतर असेच दुसरे मोठे हाय प्रोफाईल प्रकरण शोधण्यामध्ये व्यस्त होतात, असा आरोप त्यांच्यावर याआधीही धनंजय मुंडे यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यांनी केलेला आहे. दुसरीकडे अंजली दमानिया यांनी मागील दोन महिन्यांमध्ये अर्धवट माहितीच्या आधारे निराधार व खोटे आरोप केल्याचे याआधी उघड झालेले आहे. तर दुसरीकडे अंजली दमानिया यांच्या संदर्भात सुरज चव्हाण यांनी २५ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा केलेला आरोप व त्यावरून ते पुराव्यांसह खुलासा करणार असल्याचे सूरज यांनी बोलले असून आता सुरज चव्हाण पुढे याबाबत काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---------------

### आदित्य जीवने यांच्याकडून दहावीच्या परिक्षा

करण्याच्या सूचना केंडसंचालक व पोलीस यंत्रणेला दिल्या. चंपावती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एक विद्यार्थी कॉपी करताना आढळून आला त्या विद्यार्थ्यांला रेष्ट तिकीट करण्यात आले.त्या नंतर इंदीरा गांधी उर्दू केंद्राला भेट दिली. परिक्षा केंद्राबाहेरील उपद्रव, सी.सि. टी.व्ही कॅमेरे, खिडक्यांची तावदाने, प्रत्येक परीक्षा केंद्र कॉपीमुक्त,बैठेपथक, इ.बाबत भेटीच्या वेळी केंद्रसंचालक उपस्थित शिक्षण विभागाच्या यंत्रणेला दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी नानभाऊ हजारे,प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षण विस्तार अधिकारी मिलिंद तुरूकमारे व गटशिक्षणाधिकारी कार्यालय पं. स.बीडचे शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम पवार उपस्थित होते.


--------------

### भक्ती, शक्ती अन् युक्ती हे

राहिले नसून, ते आता देशपातळीवर गेले आहे. या संमेलनालाचे उद्घाटन माझ्या हस्ते झाले हे माझे भाग्य आहे, असे ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिपप्रज्ज्वलनाने ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले. दिल्ली येथील छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरी (तालकटोरा स्टेडियम) येथे संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या ज्येष्ठ अभ्यासक-संशोधक डॉ. तारा भवाळकर या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आहेत. ७१ वर्षांनंतर दिल्लीत तीन दिवसीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार २१ ते रविवार २३ फेब्रुवारी दरम्यान हे साहित्य संमेलन दिल्लीत चालणार आहे. साहित्य संमेलनाला स्वागताध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रमुख पाहुणे होते. साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीराम पवार आणि साहित्यिक यांची देखील उद्घाटन कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

--------------

# रविवारी जयंत केजकर यांचे गायन



अंबाजोगाई । प्रतिनिधी
येथील संगीत साधना मंचच्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी मासिक सभा होणार असून रविवारी २३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सभेत प्रख्यात गायक जयंत केजकर यांचे स्वतंत्र गायन होणार आहे संवादिनीवर विश्वजित धाट हे तर महेश साळुंके तबल्यावर साथसंगत करतील खोलेश्वर महाविद्यालयात सायंकाळी साडेसहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

संगीत सभेची वर्षपुर्ती

गेल्या एक वर्षापासून अखंडपणे सुरू असलेल्या या संगीत सभेची वर्षपुर्ती होत आहे शहरातील मासिक संगीत सभेच्या उपक्रमास प्रत्येक घटकांचे सहकार्य लाभले म्हणूनच मासिक संगीत सभेची वर्षपुर्ती झाली.

# राष्ट्रीय स्पर्धेत बीडच्या महेश घुले यांना रौप्य पदक

पुणे । प्रतिनिधी

अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, कामगार कल्याण मंत्रालय नवी दिल्ली यांच्यामार्फत दरवर्षी केंद्र शासन व राज्य शासन मध्ये कार्यरत असणारे अधिकारी कर्मचारी यांच्याकरिता राज्य – राष्ट्रीय पातळीवर विविध खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. अखिल भारतीय नागरीसेवा क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या वतीने यावर्षी राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन श्री शिवछत्रपती क्रीडापीठ महाळुंगे – बालेवाडी पुणे, येथे दिनांक १७ ते २१ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले. आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्र राज्यशासन यांच्या वतीने सचिवालय जिमखाना मुंबई यांच्याकडे सोपवण्यात आली होती. या स्पर्धेत विविध राज्यांचे २२ संघ व ३५३ खेळाडू विविध वजन गटामध्ये सहभागी झाले होते. राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन २००५ नंतर यावर्षी महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे करण्यात आले होते. दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सर्व संघांचे व्यवस्थापक व प्रशिक्षक यांची बैठक दुपारी चार वाजता पार पडली.स्पर्धेचे उद्घाटन दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता माननीय श्री चंद्रकांत पुलकुंडवार विभागीय आयुक्त पुणे, श्री सतीश जोंधळे सभापती सचिवालय जिमखाना मुंबई, मा. दमय्यावार साहेब अवर सचिव शालेय शिक्षण,क्रीडा व युवक सेवा मुंबई, स्पर्धा समन्वयक श्री जोगिंदर सिंग दिल्ली, स्पर्धा सचिव श्री संजय कदम, स्पर्धाप्रमुख श्री अरुण पाटील क्रीडा अधिकारी, सचिवालय जिमखाना मानद सचिव श्री संजय पोफळे (कुस्ती), तांत्रिक समिती प्रमुख श्री संदीप वांजळे या मान्यवरांच्या हस्ते पार पडले. सचिवालय जिमखाना मानद सचिव श्री संजय पोफळे यांनी महाराष्ट्र राज्य शासन कुस्ती संघाची निवड चाचणी दिनांक ४ फेब्रुवारी रोजी लालबहादूर शास्त्री व्यायाम शाळा, मध्य रेल्वे माटुंगा मुंबई, या ठिकाणी आयोजित केली. या चाचणीद्वारे महाराष्ट्र राज्य शासनाचा कुस्ती संघ निवडण्यात आला. या संघामध्ये बजरंग क्रीडा मंडळ व व्यायामशाळा वाघीराचे खेळाडू, आर टी ओ ऑफिस पिंपरी चिंचवड येथे कार्यरत असलेले राष्ट्रीय खेळाडू, पैलवान प्रा महेश घुले ७२ किलो ग्रिको रोमन व वन विभाग सातारा येथे कार्यरत असलेले श्री विलास वाघमारे (राष्ट्रीय पदक विजेते) ५७ किलो फ्री स्टाईल यांनी प्रथम क्रमांक मिळवून संघात स्थान पक्के केले. हा संघ दिनांक १७ ते २१ फेब्रुवारी २०२५ रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला.




## विलास वाघमारे यांची उत्तम कामगिरी

पैलवान प्रा महेश घुले हे, राष्ट्रीय खेळाडू बजरंग क्रीडा मंडळ व व्यायामशाळा वाघीराचे संस्थापक श्री हरिभाऊ बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तयारी करतात. या राष्ट्रीय स्पर्धेत ७२ किलो वजनगट मध्ये महेश घुले यांनी प्रथम फेरीत आनंदू कृष्णन केरळ यांचा दोन विरुद्ध दहा अशा गुण फरकाने पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, उपांत्यपूर्व फेरीत उत्तर प्रदेशच्या अजय सिंग यांचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला, महेश घुले यांचा सामना आर.एस.बी. मुंबई संघाच्या अमोल कोंढाळकर यांच्याबरोबर झाला, या सामन्यात आठ गुणांच्या फरकाने विजयी होऊन महेश घुले यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला.अंतिम फेरीचा सुवर्ण व रौप्य पदकाचा सामना हरियाणाच्या असलम खान यांच्याबरोबर झाला या सामन्यात सहा गुणांच्या फरकाने पराभव पत्करावा लागल्यामुळे महेश घुले यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र ग्रीको रोमन संघाने सर्वसाधारण उपविजेतेपद प्राप्त केले,तसेच महिला संघाने सुद्धा सर्वसाधारण उपविजेतेपद प्राप्त केले या स्पर्धेचे बक्षीस वितरण श्री दीपक शिवानंद पांडे () अप्पर पोलीस महासंचालक दळण वळण पुणे, रुस्तम ए हिंद पै.अमोल बुचडे, राष्ट्रीय स्पर्धा समन्वयक श्री जोगिंदर सिंग व इतर मान्यवर यांच्या हस्ते पार पडले.

अखिल भारतीय नागरी सेवा राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत महेश घुले यांनी रौप्य पदक प्राप्त केले, याबद्दल बजरंग क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा कोशाध्यक्ष बीड जिल्हा रग्बी असोसिएशन, राष्ट्रीय खेळाडू श्री हरिभाऊ बांगर,बीड जिल्हा रग्बी असोसिएशन अध्यक्ष इसाक शेख, उपाध्यक्ष रमेश सानप,कार्याध्यक्ष नितीन येळवे कोच शोएब खाटीक,अशोक चौरे, आंतरराष्ट्रीय खेळाडू यश जाधव, क्रीडा मंडळ उपाध्यक्ष बिभीषण बांगर वैजनाथ बांगर,कुंडलिक बांगर, सुंदर बांगर,भाऊसाहेब बांगर, शिवाजी गोपाळघरे, वाघीरा गावचे सरपंच श्रीकृष्ण बांगर, उपसरपंच दत्तात्रय बांगर, आरटीओ अधिकारी गणेश विघ्ने, राहुल बांगर, डॉ. लक्ष्मण विघ्ने, फिटनेस कोच श्रीकृष्ण बांगर, शांतीलाल गोपाळघरे डॉ. सुरज बांगर, डॉ. महेंद्र बांगर,डॉ. विकास नागरगोजे, डॉ. पवन बांगर, अमर बांगर,गणेश बावणे,दादा बांगर, महाराष्ट्र पोलीस सचिन बांगर,बाबू सानप, मधुकर पन्हाळकर, कृष्णा बांगर, चांगदेव विघ्ने, दिलीप बांगर, चक्रधर बांगर, रवी बांगर, यांच्यासह वाघेरा गावातील नागरिकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरून...

### स्वारातीच्या परिचरिकांचे

आंदोलन प्रसंगी परीचारकांनी व्यक्त केली आहे. या काम बंद आंदोलनात महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सिंग फेडरेशन संलग्न परिचारिका सेवा संघ अंबाजोगाईच्या अध्यक्षा श्रीमती चित्ररेखा बांगर सचिव श्रीमती रागिनी पवार कार्याध्यक्ष मंगेश सुरवसे उपाध्यक्ष राम फड यांच्यासह संघटनेचे इतर पदाधिकारी श्रीमती आशा माने अशोक मोराळे ,मनोज जरांगे, नीता घोडके ,वर्षा ठाकूर यांच्यासह सर्वांनी मिळून हे आंदोलन यशस्वीपणे पार पाडले.

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयात

होती. राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेत कु.साधना कैलास टाकणखार (प्रथम), मोहीनी चंद्रशेखर पायघन (द्वितीय), निकिता लक्ष्मण लांडगे (तृतीय) तर निता लक्ष्मण राठोड व आरती दामोदर वाघमारे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम,स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. बालाजी बोडके यांनी केले. सूत्रसंचालन कु.दिपाली शेजुळ यांनी केले तर आभार प्रा सुदर्शन स्वामी यांनी मानले. यावेळी डॉ.के.बी. गंगने,डॉ.संजय व्यवहारे,डॉ गणेश मोकासरे,डॉ सुरेश देशमुख,प्रा.सतीश डाके, प्रा.आनंद वैजवाडे यांच्यासह विद्यार्थी -विद्यार्थिनी,स्पर्धेक, प्राध्यापक उपस्थित होते.

### दीपस्तंभ गुरुकुल म्हणजे विद्यार्थ्यांच्या

आली. या कार्यक्रमासाठी मंचावर उपस्थित अध्यक्ष प्रा. डॉक्टर अशोक खेत्री सर प्रमुख पाहुणे इतापुरे सर, संभाजी मुंडे सर, समाजसेवक लहू गवळी सर, राठोड सर उपस्थित होते. यावेळी वकृत्व स्पर्धेमध्ये प्रथम विद्यार्थी करण मुंडे द्वितीय विद्यार्थी वैभव डोंगरे व तृतीय विद्यार्थी तानाजी ढगे यांना प्रमाणपत्र व बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला तसेच या स्पर्धेमध्ये सुभाष मुंडे, चैतन्य मुंडे, अविष्कार मुजमुले, ज्ञानेश्वर फड, गवळी ओंकार, अविनाश पवार, कुंडलिक राठोड यांनी भाग घेतला आणि सहभागी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्राचे वाटप केले व त्यानंतर ईतापुरे सर व प्राध्यापक डॉक्टर अशोक खेत्री सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व शेवटी दीपस्तंभ गुरुकुल चे संचालक मुंडे सर यांनी आभार प्रदर्शन केले

### केव्हीके वैज्ञानिक सल्लागार

केंद्राचा मागील वर्षाचा प्रगती अहवाल सादर केला, तसेच पुढील वर्षाचा कृती आराखडा वाचन केले. डॉ. जायभाये यांनी कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धीमत्ता विषयी माहिती दिली. मंदार कुलकर्णी यांनी ऑनलाईन विक्री व्यवस्थापन विषयी माहिती दिली. डॉ. वाघमारे यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या कामाचा गौरव करत उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले, कृषी रसायनांच्या बाबतीत शेतकऱ्याला समजेल अशा शब्दांमध्ये तंत्रज्ञान प्रचाराची गरज त्यांनी व्यक्त केली. उडीद पिकातील कीड - रोग व्यवस्थापना संदर्भात प्रात्यक्षिक आयोजन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोप करताना डॉ. उपेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले की, बैठकीमध्ये सदस्यांनी केलेल्या सर्व सूचनांचा पूर्तता करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र प्राधान्याने प्रयत्न करील. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते विस्तार घडीपत्रिका बायोडायनॅमिक कॅलेंडर २०२५ चे प्रकाशन तसेच केंद्राच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांनी उत्पादित लिंबाच्या 'सुधारस' या प्रक्रिया उत्पादनाचे अनावरण केले. बैठकीचे सूत्रसंचालन शास्त्रज्ञ कृष्णा कर्डिले तर आभार रोहिणी भरड यांनी व्यक्त केले.

# मोठेवाडीत आरंभ बालक-पालक मेळावा उत्साहात



माजलगाव । प्रतिनिधी
तालुक्यातील मोठेवाडी येथे गंगामसला बीटअंतर्गत आरंभ बालक-पालक मेळावा दि २१ फेब्रुवारी शुक्रवार रोजी साजरा करण्यात आला. मेळाव्यांतर्गत गरोदर माता, तसेच शून्य ते तीन वयोगटांतील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्टॉल लावण्यात आले होते.अध्यक्षस्थानी माजी सरपंच अविनाश गोंडे होते तर चेअरमन संभाजी चव्हाण, माजी सरपंच विष्णू खेत्री,पत्रकार राजाभाऊ पास्टे, विलास खेत्री प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मेळाव्याचे उद्घाटन आरंभ नामकरण करून करण्यात आले.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश गोंडे यांनी केले तर शिक्षक संतोष जगताप यांनी माता पालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पर्यवेक्षिका वैशाली रत्नपारखी, शिवाजी गिराम, बाबुराव वराडे, प्रभाकर खेत्री, भगवान पवार, दत्तात्रय चव्हाण, गजानन गोंडे,बाळु रासवे,अनिल खेत्री, तुकाराम रासवे, शिक्षक उत्तम ढवळे,आर.पी. राठोड व मोठेवाडी शाळेतील सर्व शिक्षक,मोठेवाडी बीटमधील अंगणवाडी सेविका, मदतनीस उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोठेवाडी येथील अंगणवाडी सेविका तसेच सर्व मदतनीस यांचे योगदान लाभले. ज्योती किर्जत यांनी सूत्रसंचालन केले. शारदा खेत्री यांनी स्वागत केले व सोनाली भदरगे यांनी आभार मानले.

# शिवजयंती निमित्ताने केंद्रीय जि.प.प्राथमिक शाळेमध्ये वक्तृत्व स्पर्धेचे यशस्वी आयोजन

युसूफवडगांव । प्रतिनिधी
केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील केंद्रीय जि.प.प्राथमिक शाळेमध्ये हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने गावातील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते.यामध्ये शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांने आपला सहभाग नोंदवत वक्तृत्व स्पर्धा यशस्वी केली.यामध्ये पहिल्याच्या वर्गातुन १)चि.आनंद ओमकार लामतुरे,२)कु.रिद्धी रंजित रांजणकर,३)चि.आयुष्य धिरज इरगट,दुसरी वर्गातुन १)कु.अस्मिता धिरज इरगट,२)चि.नयन गणेश थळकरी,३)कु.श्रावणी सुशांत निकम,तिसऱ्या वर्गातुन १)कु.लावण्या शंकर निशिगंध, २)चि.संविधान पोपट वैरागे,३)चि.शिवतेज गणेश थळकरी, चौथ्या वर्गातुन १)कु.तेजस्विनी गणेश रोडगे,२)कु.अपुर्वा धिरज इरगट,३)चि.पृथ्वीराज किरण जाधव,पाचवी वर्गातुन १)चि.संस्कार श्यामसुंदर निकम,२)कु.राजनंदिनी राजलिंग पाटील,३)कु.समृद्धी अशोक कवडे, सहावी वर्गातुन १)कु.सई अशोक कवडे,२)कु.महिमा हनुमंत एडके,३)कु.शिवानई जग जगन्नाथ स्वामी तर सातवी वर्गातुन १)कु.मेघाराणी रंजित रांजणकर,२)कु.संस्कृती शामसुंदर निकम,३)कु.अश्विनी शाम टिंगरे या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी होत बक्षीस मिळवले.या स्पर्धेचे आयोजन प्रभुलिंग पाटील,अँड.हनुमंत जाधव,कैलास तानगे,ज्योतिराम सावंत,मयुर खंडेलवाल,गणेश रोडगे,ज्योतिराम शिंदे,महादेव चोपणे व समाधान मुकदम यांनी केले होते.याकामी त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले.

### युसूफवडगांव येथील भिमनगर मध्ये शिवजयंती उत्साहात

युसूफवडगांव । प्रतिनिधी
केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील भिमनगर मधील बौद्ध विहारात आज छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली.

शिव जयंती निमित्ताने भिमनगर मधील बौद्ध विहारात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष भैय्या सावंत,सचिन जावळे व किरण सातपुते यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी ग्रा.प.सदस्य दादा निकम,अशोक चोपणे,संजय लांडगे,चंद्रकांत सातपुते, श्रीकांत सौंदणे,अनिल निकम,किरण जावळे,उमेश बाबर,राहुल उजगरे,जयराज निशिगंध,रमेश निशिगंध,बाबु शिंदे,प्रभाकर डिकुळे,हनुमंत तिरकर,अविनाश सातपुते,पत्रकार सचिन उजगरे यादी उपस्थित होते.

# अभियंता आडे, कर्मचारी कसबे व कंत्राटदार देशमुख यांच्या कृपेने शहरातील मोंढा रोडवर मागील ३ दिवसांपासून जातेय दररोज लाखो लिटर पाणी वाया

### मुख्याधिकारी प्रियंका टोंगे मूग गिळून गप्प असल्यामुळे नागरिकांतून आश्चर्य व्यक्त

अंबाजोगाई । प्रतिनिधी
अंबाजोगाई नगर परिषदे मधील पाणी पुरवठा अभियंता आडे, या विभातील सर्वेसर्वा कर्मचारी कपिल कसबे व लाडके कंत्राटदार देशमुख यांच्या कृपेने शहरातील मोंढा रोड वर मागील ३ दिवसा पासून पाईप लाईन फुटल्या मुळे दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असताना मुख्याधिकारी प्रियंका टोंगे मात्र मूग गिळून गप्प असल्या मुळे नागरिकांतून आश्चर्य व्यक्त होत आहे.

मागील ७ ते ८ वर्षा पासून अंबाजोगाई नगर परिषदेने पाणी पुरवठा विभागा मधील सर्व प्रकारची नवी आणि दुरुस्तीची कामे करण्या साठी देशमुख नामक कंत्राटदाराची नियुक्ती केलेली असून पाणी पुरवठा विभागाचे अभियंता, या विभागातील सर्वेसर्वा कर्मचारी कपिल कसबे व कंत्राटदार देशमुख



यांच्या संगणमताने या विभागात जो सावळा गोंधळ सुरू आहे या गोंधळा मागे मोठे अर्थकारण दडलेले आहे.

या विभागा अंतर्गत होणारी नवीन कामे आणि दुरुस्तीची कामे यातून केवळ भ्रष्टाचार सुरू नाही तर या महाभागा मुळे पाईप लाईन च्या दुरुस्त्या वेळेवर होत नसल्या मुळे दररोज लाखो लिटर पाणी वाया जाते आहे आणि या कडे कोणाचे ही लक्ष नाही हे दुर्दैव आहे.विशेष म्हणजे मागील ३ वर्षात नगर परिषदेस ना नगराध्यक्ष आहे ना नगरसेवक आहे आणि याचा पुरेपूर फायदा हा नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी व कंत्राटदार घेताना दिसत आसून मागील ३ दिवसा पासून येथील मोंढा रोड वरील बाटा शो रूमच्या समोरील बाजूस पाणी पुरवठा अभियंता आडे, या विभातील सर्वेसर्वा कर्मचारी कपिल कसबे व लाडके कंत्राटदार देशमुख यांच्या कृपेने पाईप लाईन फुटल्या मुळे दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असताना न प च्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांचे पाण्या सारख्या गंभीर विषयावर आणि या विभागात सुरू असलेल्या गैर प्रकारा कडे लक्ष नसल्याने आणि त्या मात्र मूग गिळून गप्प असल्या मुळे नागरिकांतून आश्चर्य व्यक्त होत आहे.

# राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राचार्य विष्णुपंत रसाळ यांना जाहीर

बीड । प्रतिनिधी
मांजरसुंबा येथील जीवन कला मंडळ बीड संचलित डॉ . पारनेरकर महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विष्णुपंत रसाळ सर यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पहाट फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा २०२५ यावर्षीचा राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. शेगाव येथे उद्या रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी भव्य कार्यक्रमात केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, भास्करराव पेरे पाटील (आदर्श सरपंच पाटोदा यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते रसाळ सर यांना देऊन गौरविण्यात येणार आहे .

प्राचार्य विष्णुपंत रसाळ सर हे गेली ३५ वर्षापासून शिक्षणाचा प्रचार व प्रसार करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातील त्यांचे खूप मोठे योगदान आहे. त्यांनी अनेक आदर्श विद्यार्थी घडविले आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी आज प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत. शिवाय शिक्षण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही त्यांच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. त्यांना यापूर्वी जिल्हा व राज्य पातळीवरील अनेक मानाचे गौरव पुरस्कार मिळालेले आहेत . रसाळ सर यांनी बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव, गणित अध्यापक मंडळाचे जिल्हाध्यक्ष तसेच जिल्हाध्यक्ष शिक्षक सेना जिल्हा बीड म्हणून व



सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेले आहे . या कामाची दखल घेऊन छत्रपती संभाजी नगर येथील पहाट फाउंडेशनच्या संचालिका अर्पिता सुरडकर यांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ही निवड केली आहे. सदरील पुरस्काराचे उद्या रविवार दिनांक २३ रोजी भव्य कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे. प्राचार्य विष्णुपंत रसाळ सर यांना हा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे जीवन कला मंडळ बीडचे अध्यक्ष गंगाधरराव आगलावे, सचिव गणेशराव जहागीरदार, कार्याध्यक्ष अशोकराव महाजन, कोषाध्यक्ष मुरलीधरराव देशपांडे व सर्व संचालक, शालेय समिती सदस्य अरुणराव कुंडलकर सर, धर्मराज रसाळ सर, शिक्षणाधिकारी मा . नागनाथ शिंदे साहेब , उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे साहेब, काकडे साहेब , अधीक्षक बहिर साहेब, खटावकर साहेब, लेखाधिकारी थोरात साहेब, मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव प्राचार्य पैठणे जे एम, बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष शंकर पवार सर, गणेश घोडके सर , लक्ष्मणराव इंगोले सर, प्राचार्य रामहरी कदम, मांजरसुंबा येथील सरपंच सौ मनिषाताई रसाळ , उपसरपंच शेख अजिज व सर्व ग्रामपंचायत सदस्य, गणित अध्यापक मंडळ बीड जिल्हा सचिव बन्सी हावळे , शिक्षक सेना बीड जिल्हाध्यक्ष गौतम चक्रे , सचिव सतीश रसाळ, दिलीप डावकर, विलास अनवणे, गोपाळ पवार, लक्ष्मणराव मळेकर, प्राध्यापक सरवदे सर, मुळे सर, झोडगे आप्पा इत्यादी प्राचार्य, मुख्याध्यापक , प्राध्यापक , शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल मध्ये शिवजयंती साजरी




### तरुण पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करावेत - पंडीत दोडताले सर

वडवणी । प्रतिनिधी
१९ फेब्रुवारी २०२५ रोजी ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श शिक्षक श्री.पंडित दोडताले सर तर प्रमुख पाहुणे श्री.बाळासाहेब मुंडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले त्यानंतर गुरुकुल मधील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दलचे विचार आपल्या भाषणातून व्यक्त केले तसेच काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, गीत ,पाळणा सादर केला. त्यानंतर अध्यक्षीय भाषण करताना श्री दोडताले सरांनी विद्यार्थ्यांना महाराजांचे आचार आणि विचार आत्मसात करून आपण आपले ध्येय प्राप्त करावे असे सांगितले. श्रीमती.दोडताले मॅडम गुरुकुलचे संचालक श्री.डोईफोडे सर व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी आभार श्रीमती.डोईफोडे मॅडम यांनी मानले

cmyk


राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.२२ फेब्रुवारी २०२५
४

# केंद्र शासनाच्या ‘नक्शा’ प्रकल्पास बारामतीत प्रारंभ

बारामती : केंद्र शासनाने शहरी भूअभिलेखांचे डिजिटायझेशन करण्यासाठी देशातील १५२ नगरपालिकांत ‘नक्शा’ प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरू केला आहे. राज्यात बारामतीसह दहा नगरपालिकांचा या उपक्रमात समावेश असून, बारामती नगर परिषद क्षेत्रात मंगळवारपासून या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. शहराच्या हद्दीतील ५२ चौरस किलोमीटर भूभागांचे सर्वेक्षण याअंतर्गत करण्यात येणार आहे.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मध्य प्रदेशातील रायसेन येथे नक्शा (राष्ट्रीय भौगोलिक माहिती आधारित शहरी भूमापन) प्रकल्पाचा प्रारंभ केला. बारामतीत या कार्यक्रमाचे दृकश्राव्य प्रक्षेपण करण्यात आले.

यावेळी सर्व्हे ऑफ इंडिया अधिकारी भूपेंद्र परमार, उपविभागीय अधिकारी बारामती वैभव नावडकर, जिल्हा भूमी अधीक्षक सूर्यकांत मोरे, मुख्याधिकारी महेश रोकडे, भूमी अभिलेख उपअधीक्षक संजय धोंगडे, उपमुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळराजे मुळीक, नितीन हाट्टे व




नागरिक उपस्थित होते. नक्शा प्रकल्प केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भू-संसाधन विभागांतर्गत राबविला जात आहे. या प्रकल्पाद्वारे शहरी भूअभिलेखांचे आधुनिकीकरण, भूमालकीची स्पष्टता आणि भू-विकास प्रक्रियेत पारदर्शकता आणली जाणार असल्याचे संजय धोंगडे यांनी नमूद केले.

### ...असा आहे प्रकल्प

आधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) मदतीने भूमापन प्रक्रिया सुधारली जाईल. सर्व्हे ऑफ इंडिया तांत्रिक भागीदार असून, ड्रोनच्या साहाय्याने हवाई सर्वेक्षण केले जाईल. यामुळे सुधारित नकाशे तयार करून व त्यांची मालकीबाबत हक्क चौकशी करून अधिक अचूक भूअभिलेख तयार करता येतील. अचूक भूअभिलेखामुळे भूमालकीशी संबंधित वाद कमी होतील. जमिनीची पत वाढेल, नगरपालिकेला शहरी विकास आराखडे तयार करताना जीआयएस तंत्रज्ञानाचा उपयोग होईल. मालमत्तांच्या खरेदी-विक्रीत स्पष्टता राहील, अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवता येईल. स्थावर मालमत्तेचा अद्ययावत नकाशा उपलब्ध झाल्याने कर आकारणी अधिक प्रभावी होईल.

# संत्र्याच्या शेतीतून लाखोंचा नफा



पारंपारिक शेतीला फाटा देत शेतकरी आता आधुनिक आणि नगदी पीक देणाऱ्या शेतीकडे वळू लागले आहेत. थोडसं पाणी उपलब्ध असलं तरी चांगलं नियोजन केलं तर चांगल्या उत्पन्नाची पीक घेता येऊ शकतात, याचे उत्तम उदाहरण अहिल्यानगरच्या भोसे येथील अशोक टेमकर यांनी दाखवून दिले आहे. टेमकर यांच्याकडे असलेल्या संत्रा बागेच्या शेतीतून ते चांगले उत्पन्न मिळवत आहेत. अडीच एकरवर असलेली संत्राबाग त्यांना वर्षाला दहा लाख रुपयांचा निव्वळ नफा देत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील भोसेगाव या परिसरात साडेतीनशे ते चारशे मिमी पाऊस पडतो. कमी पाऊस असल्यामुळे या भागातील शेतकरी पारंपारिक खरीपाची पिके घेतात. मात्र मागील काही वर्षांपासून भोसे गावातील शेतकरी फळबागांकडे वळले आहेत. प्रत्येक शेतकऱ्याकडे छोटी-मोठी फळबाग आहे. यात, डाळिंब आणि संत्रा बाग या भागात जास्त पाहायला मिळते.

दहा लाख रुपयांचा निव्वळ नफा

अशोक टेमकर यांची १६ एकर शेती आहे. यातील अडीच एकरवर त्यांनी साडेसातशे संत्र्याची झाड लावली आहेत. बारा बाय बारा अंतरावर असलेल्या या संत्रा झाडांना सरासरी ४० ते ६० किलो संत्र्याचे उत्पन्न मिळत आहे. एक वेळेस पीक घेण्यासाठी साधारण अडीच ते तीन लाख रुपयापर्यंत खर्चही येतो. यावर्षी संत्रा बागेतून त्यांना दहा लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळाला आहे.

शेतकऱ्यांनी फळबागांकडे वळल्यास फायदा : परिसरात बागांची संख्या वाढल्यामुळे गावातच व्यापारी देखील तयार झाले आहेत. त्या परिसरातील बागांमध्ये मिळणारी फळे दर्जेदार असल्यामुळे त्यांना चांगली मागणी देखील आहे. मुंबई, दिल्ली या बाजारासोबतच दक्षिणेकडील बाजारातही या भागातील फळांना मागणी असते. सध्या चांगला भाव असल्यामुळे व्यापार्यांना देखील चांगला नफा मिळत आहे. पारंपारिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पिकासाठी खर्च केलेले पैसेही मिळणं अवघड होतं. त्यातच आधुनिक शेतीची कास धरत आपल्याकडे असलेल्या साधनसामग्रीच्या जोरावर चांगली पिके घेता येऊ शकतात आणि चांगलं उत्पन्नही मिळवता येतं. थोडं पाणी उपलब्ध असलेल्या शेतकर्यांनी आता फळबागांकडे वळल्यास त्यांचा फायदा होऊ शकतो, असे व्यापाऱ्यांनी म्हटले आहे.

# चिकूच्या लागवडीसाठी वातावरण अन सुधारीत जाती

महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातील चिकूची लागवड यशस्वी होऊ शकते. मूळच्या उष्ण प्रदेशातील ह्या फळाला उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. चिकूच्या पिकाच्या फुलोऱ्याच्या काळात तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास फुलोरा गळतो, तसेच किमान तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यास झाडाची वाढ खुंटते. अशा वेळी लहान झाडांची विशेष काळजी घ्यावी लागते. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या उत्तर भागात उन्हाळयात चिकूच्या पिकाला पाण्याच्या जास्त पाळया द्याव्या लागतात. कमी पावसाच्या प्रदेशात बागेला पाण्याच्या पाळ्या वाढवून चिकूची लागवड करता येते. चिकूच्या पिकाला सर्व प्रकारची जमीन मानवते.

तथापि नदीकाठची, गाळवट, पोयट्याची, समुद्र किनाऱ्याजवळची जमीन अधिक चांगली असते. काळया व भारी जमिनीत निवऱ्यासाठी चर खणून चिकूची लागवड करावी. पाणथळ भागात किंवा जमिनीत ते १५ मीटरच्या खाली पक्का कातळ असलेल्या भागात अथवा अती हलक्या उथळ जमिनीत चिकूच्या झाडाची वाढ चांगली होत नाही. पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसलेल्या आणि चुनखडीचे प्रमाण जास्त असलेल्या जमिनीत चिकूची लागवड करू नये.

सुधारित जाती : महाराष्ट्रात चिकूच्या कालीपत्ती व क्रिकेट बॉल ह्या प्रमुख जाती लागवडीखाली आहेत. कालीपत्ती या जातीच्या झाडाची पाने गडद हिरव्या रंगाची आणि रुंद असतात. झाड पसरत वाढते. या जातीची फळे मोठी, अंडाकृती आणि भरपूर गरयुक्त असतात. फळांचा गर मऊ आणि गोड असतो. फळात बियांचे प्रमाण कमी असून प्रत्येक फळात २ ते ४ बिया असतात. फळाची साल पातळ असते. महाराष्ट्रात ह्या जातीच्या लागवडीसाठी शिफारस केली आहे. क्रिकेट



बॉल या जातीच्या झाडाची पाने गडद हिरव्या रंगाची असतात. फळे आकाराने मोठी असतात; परंतु फळांचा गर दाणेदार व कमी गोड असतो. या जातीच्या फळांची प्रत मध्यम असून उत्पादन कमी येते.

चिकूची अभिवृद्धी बियांपासून, तसेच शाखीय पद्धतीने, गुटी कलम, भेट कलम व मृदकाष्ठ कलम अशा प्रकारे करता येते. चिकूची बियांपासून अभिवृद्धी केल्यास फळे लागण्यास अधिक काळ लागतो आणि सर्व झाडे सारख्या गुणवत्तेची निपजत नाहीत. म्हणूनच शाखीय पद्धतीने अभिवृद्धी करावी. गुटी कलम पद्धतीत चिकूची अभिवृद्धी करता येत असली तरी या पद्धतीने यश कमी प्रमाणात मिळते. भेट कलम किंवा मुदुकाष्ठ कलम लावून केलेली लागवड ही झाडापासून मिळणारे उत्पादन वाढविस्तार व कणखरपणा या दृष्टीने अधिक फायद्याची असल्यामुळे ह्या पद्धतीने चिकूची अभिवृद्धी मोठ्या प्रमाणावर केली जाते. भेट कलम आणि मृदुकाष्ठ कलम या दोन्ही पद्धतीत खिरणी (रायणी) या खुंटाचा चिकूची कलमे बांधण्यासाठी उपयोग करतात. खिरणीची रोपे अतिशय हळू वाढतात. खिरणीच्या रोपाला भेट कलम करण्यायोग्य जाडी येण्यासाठी साधारणपणे दोन वर्षे लागतात. कलम बांधणीसाठी खुंटरोपाची कमतरता तसेच कलम तयार होण्यासाठी लागणारा काळ ह्यामुळे चिकूची कलमे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत नाहीत.

चिकूच्या कलमांची खरेदी करताना अशी काळजी घ्या :

१) खुंट आणि डोळकाडी सारख्याच जाडीचे असावेत. २) कलम सरळ वाढलेले आणि त्यावर भरपूर निरोगी पाने असावीत. ३) कलम केलेला भाग (सांधा) हा एकरूप झालेला असावा. कलमांची उंची अर्धा मीटर असावी. ४) कलम खिरणीच्या (रायणी) खुंटावरच केलेले असावे, मोहाच्या रोपावरील चिकूची कलमे खरेदी करू नयेत. ५) स्वतः तयार केलेली कलमे अथवा शासकीय किंवा कृषी विद्यापीठाच्या किंवा मान्यताप्राप्त नामांकित रोपवाटिकेतील चिकूची कलमे लागवडीसाठी वापरावीत.

# माती परिक्षण करताना अशी काळजी घ्या!

मातीतील अन्नाशांचे प्रमाण तपासून त्यानुसार खतांच्या मात्रा देणे नेहमीच फायदेशीर असते. मातीचा सामू म्हणजे आम्ल-विम्ल निर्देशांक, पाण्यात विरघळणारे क्षारांचे प्रमाण, चुन्याचे प्रमाण, सेंद्रिय कर्ब, उपलब्ध नत्र, स्फुरद व पालाश तसेच जिप्सम, गंधक यांची जमिनीतील प्रमाण समजण्यासाठी माती परिक्षण ही अतिशय महत्त्वाची चाचणी आहे. शिवाय पृथकरण अहवालावरून आलेल्या निकालाची योग्य वर्गवारी करणेही आवश्यक असते, तसेच त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी केली तरच आपणास त्याचे महत्त्व समजू शकेल. शिवाय जमिनीतील सुक्ष्म अन्नद्रव्ये, भौतीक गुणधर्म व निचरा म्हणजेच थोडक्यात जमिनीचे आरोग्य कशा प्रकारचे आहे हे समजते.

जमिनीच्या सामूवरून जमिनीची आम्लता व विम्लता मोजता येते. सामू सहा पेक्षा कमी असेल तर आम्लयुक्त, ६.५ ते ७.५ च्या दरम्यान योग्य, ८.५ पेक्षा जास्त असेल तर विम्लयुक्त जमीन असते. जमिनीचा सामू व अन्नद्रव्याची उपलब्धता यांचा परस्पर संबंध असून सामू सहा ते सात दरम्यान असेल तर अन्नद्रव्याची उपलब्धताही अधिक रहाते. तसेच क्षारांच्या बाबतीत देखील क्षरांचे प्रमाण हे ०.४ ते ०.८ डेसिसायमन/चौ. मी. पेक्षा कमी असेल तर जमीन चांगली म्हणता येते पण हिर क्षारता १.२ किंवा ३.२ पर्यंत वाढली तर ती जमीन जास्त क्षारयुक्त गटात मोडते. अशा जमिनीत क्षारास प्रतिकार करणारी पीकेच वाढू शकतात मात्र क्षारांचे प्रमाण ३.२ पेक्षा जास्त झाल्यास सर्वसाधारण पिकांकरता अशी जमीन अपायकारक ठरू शकते.

माती परिक्षणा करताना घ्यावयाची काळजी : मातीचा नमुना घेण्याकरता हॉपर नळी, नमुन्याची सळई, स्क्रू गिरमीट शिवाय शेतातच उपलब्ध होणारे फावडे, खुरपी किंवा थापी जरूरीप्रमाणे वापरावी. सर्वसाधारण नमुना घेण्याचे क्षेत्र हे दोन ते आठ एकर असावे व क्षेत्र खुप उंचसखल असेल तर आकारमान कमी करावे. जमिनीचा रंग, चढउतार, खोली खडकाळपणा, खोलगटपणा, पाणथळ जागा, क्षारयुक्त, विम्लयुक्त, निरायुक्त, जमिनीचा आणि पिकाचा प्रकार, जमीन व्यवस्थापन पूर्वी घेतलेली पिके यांचा विचार करून त्याचे विभाग पाडावेत व प्रत्येक विभागातून मातीचा स्वतंत्र नमुना घ्यावा. एकसारख्या दिसणार्या जमिनीतील चार ते १६ नमुने ३० सें. मी. खोलीपर्यंत घेवून त्याचा एक प्रातिनिधीक संयुक्त नमुना घ्यावा. क्षेत्र लहान असल्यास सुधारित शेती पद्धतीचा अवलंब करीत असल्यास आठ जागी नमुने घेवून त्याचा एक संयुक्त नमुना तयार करावा. फळबाग किंवा द्राक्षवेलीसाठी साधारणपणे ४० ते ५० सें. मी. खोलीपर्यंतचा नमुना घ्यावा. विम्लयुक्त जमिनीच्या अभ्यासासाठी ९० सें.मी. खोलीपर्यंत नमुना घ्यावा. मध्य उन्हाळा ते पावसाळा सुरू होण्यापूर्वी मातीचा नमुना घ्यावा. हंमामापेक्षही पिकांची फेरपालटही तेवढीच महत्त्वाची असते. पिकाची काढणी झाल्यानंतर परंतु नांगरणीपूर्वी किंवा दुसरे पीक लावण्यापूर्वी माती परिक्षणासाठी नमुना घ्यावा. शेतात पीक उभे असल्यास दोन ओळीमधुन घ्यावा. शेतात रासायनीक खते टाकली असल्यास दोन ते अडीच महिन्यानंतर मातीचा नमुना घ्यावा. जमीन हलकी असल्यास प्रत्येक वर्षी तसेच फेरपालटाचे पीक असल्यास प्रत्येक हंगामात माती परिक्षण करून घ्यावे.



याठिकाणची माती घेऊ नका : शेतातील मोठ्या झाडाखालील, विहिरी जवळील, शेताच्या बांधावरील, वनस्पतीचे अवशेष असलेला, सेंद्रिय पदार्थ जाळलेली, कचरा टाकण्याच्या जागेतील, जनावरे बसण्याच्या जागेतील, रस्ता, कुंपन, इमारतीजवळील मातीचा नमुना घेऊ नये. तसेच रासायनिक खताच्या रिकाम्या पिशव्या नमुना भरण्यासाठी वापरू नयेत. फळबागांसाठी १०० सें. मी., कडधान्य व अन्नधान्य पिकास २० सें. मी. तर ऊस पिकासाठी ३० सें. मी. खोलीपर्यंतचा नमुना घ्यावा.

एका क्षेत्रातील अनेक नमुने घ्या : नमुना घेताना शेत जमिनीच्या पृष्ठभागावरील काडीकचरा बाजूला सारून एका क्षेत्रातील १० ते १२ ठिकाणचे नमुने घ्यावेत. टखुरपे किंवा फावडे यांचा उपयोग करून इंग्रजीतील व्ही आकाराचा १५ ते २० सें. मी. खोल खड्डा खोदावा व तिरक्या छेदावरील साखारणपणे दोन ते तीन सें. मी. थर काढून घ्यावा. असे १० ते १५ नमुने एकत्र गोणपाटावर पसरावेत नंतर त्याचे समान चार भाग करून विरुद्ध बाजूचे दोन भाग निवडावेत आणि दोन भाग टाकून द्यावेत ही कृती साधारणपणे अर्धा किलो नमुना मिळेपर्यंत करावी. माती ओली असेल तर सावलीत वाळवून लाकडी खलबत्त्याने बारीक करून दोन मी. मी. चाळणीतून चाळून नंतर आपल्या नजीकच्या कृषी अधिकार्याकडे, भेट योजने मार्फत मृद चाचणी प्रयोगशाळेकडे किंवा खाजगी प्रयोगशाळेकडे पाठवावा.पीक संरक्षणात विविध अन्नद्रव्यांचे कार्य : माती परिक्षणानंतर परिक्षण अहवालानुसार व्यवस्थापन करणे अतिशय महत्त्वाचे असते त्यानुसार शेतजमिनीत अन्नद्रव्यांचे प्रमाण अती कमी असल्यास वनस्पतींना लागणाऱ्या खताच्या नेहमीच्या शिफारशीपेक्षा दीडपट, कमी असल्यास सव्वापट आणि मध्यम असल्यास नेहमी दिल्या जाणाऱ्या खतांच्या शिफारशी इतके खत द्यावे. जमिनीत अन्नद्रव्ये मध्यम जास्त, जास्त व अति जास्त असल्यास खतांच्या मात्रा अनुक्रमे २०, ४० आणि ६० टक्के या प्रमाणात कमी कराव्यात.




## जागतिक दिवस
## सेंट लुशियाचा स्वातंत्र्यदिन
## विश्व विचार दिवस

### महत्वाच्या घटना

१८१९: स्पेनने फ्लोरिडा हा प्रांत अमेरिकेला ५० लाख डॉलरच्या मोबदल्यात विकला.
१८२१: आजच्या दिवशी स्पेन ने फ्लोरिडा हे शहर अमेरिकेला ५० लाख डॉलर ला विकले.
१८५७: रत्नागिरीत 'पतित पावन' मंदिरांची स्थापना झाली.
१९३१: स्वा. सावरकर व भागोजी शेठ यांच्या पुढाकाराने अस्पृश्यादी सर्व जातींना मुक्त प्रवेश असणाऱ्या पतितपावन मंदिर व देवालयाची स्थापना
१९४२: दुसरे महायुद्ध फिलिपाईन्समध्ये जपानी सैन्याकडुन पराभव अटळ दिसत असल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एफ. डी. रूझवेल्ट यांनी जनरल डग्लस मॅकआर्थरला माघार घ्यायचा हुकुम दिला.
१९४८: झेकोस्लोव्हाकियामध्ये कम्युनिस्ट क्रांती.
१९५४: पहिली कापड गिरणी मुंबईत सुरु
१९७४: पाकिस्तान ने आजच्या दिवशी बांगलादेश ला मान्यता प्रदान केली.
१९७८: श्री. यशवंत विष्णू चंद्रचूड यांनी भारताचे १६ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला. या पदावर सर्वात प्रर्दीघ काळ (२६९६ दिवस) त्यांनी काम केले.
१९७९: 'सेंट लुशिया' ला (ब्रिटनपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८०: आजच्या दिवशी अफगानिस्तान ने मार्शल लॉ ची घोषणा केली.
१९९८: जपान च्या नगानो शहरात हिवाळी ऑलिम्पिक चा समारोह पार पडला.
२००६: आजच्या दिवशी जपान ने भारतातून आयात होणाऱ्या पोल्ट्री पदार्थांवर बंधी घातली होती

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३२: जॉर्ज वॉशिंग्टन अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ डिसेंबर १७९९)
१८३६: महामहोपाध्याय पण्डित महेशचंद्र 'न्यायरत्न' भट्टाचार्य (मृत्यू: १२ एप्रिल १९०६)
१८५६: आर्या समाजाचे संन्यासी म्हणून ओळखले जाणारे स्वामी श्रद्धानंद यांचा जन्म.
१८५७: लॉर्ड बेडन पॉवेल बालवीर चळवळीचे प्रणेते (मृत्यू: ८ जानेवारी १९४१)
१८५७: हेन्रिच हर्ट्झ जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १८९४)
१९०२: फ्रिट्झ स्ट्रासमान जर्मन भौतिकशात्रज्ञ (मृत्यू: २२ एप्रिल १९८०)
१९२०: इफ्तिखार चरित्र अभिनेता (मृत्यू: ४ मार्च १९९५)
१९२०: भारतीय चित्रपट अभिनेते कमल कपूर यांचा जन्म.
१९२२: व्ही. जी. जोग व्हायोलिनवादक (मृत्यू: ३१ जानेवारी २००४)
१९२२: आजच्या दिवशी पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध चित्रकार एस. एच. रज़ा यांचा जन्म.
१९६४: मॉर्टल कोमबॅट व्हिडिओ गेमचे निर्माते एड बून यांचा जन्म.
१९६४: हिंदी चित्रपट दिग्दर्शक सूरज बड़जात्या यांचा जन्म.
१९७२: महाराष्ट्राचे एन्काऊंटर स्पेशलीस्ट सचिन वाझे जन्म.
१९७५: अमेरिकन अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माता ड्रिव बॅरीमोर यांचा जन्म
१९९४: प्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री केतकी माटेगावकार यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५६: ला मुघल सम्राट नसीरुद्दीन हुमायूँ चे निधन.
१८२७: चार्ल्स विल्सन पील अमेरिकन चित्रकार, निसर्गवैज्ञानिक व सैनिक (जन्म: १५ एप्रिल १७४१)
१९२५: सर थॉमस क्लिफोर्ड ऑलबट ज्वरमापीचा शोध लावणारे इंग्लिश डॉक्टर (जन्म: २० जुलै १८३६ ड्युजबरी, यॉर्कशायर, इंग्लंड)
१९४४: कस्तुरबा गांधी यांचे पुण्यातील आगाखान पॅलेसमधे निधन (जन्म: ११ एप्रिल १८६९)
१९५८: मौलाना अबूल कलाम आझाद स्वातंत्र्यचळवळीतील विद्वान नेते, भारताचे पहिले शिक्षणमंत्री, भारतरत्न (जन्म: ११ नोव्हेंबर १८८८)
१९८२: जोश मलिहाबादी ऊर्दू कवी (जन्म: ५ डिसेंबर १८९४)
१९९३: हरियाणा चे माजी मुख्यमंत्री तसेच ओडीसा आणि मध्य प्रदेश चे माजी गवर्नर भगवत दयाल शर्मा यांचे निधन.
२०००: दामोदर दिनकर तथा मधुकाका कुलकर्णी प्रकाशन व्यवसायात नवनवीन प्रयोगांसाठी ख्याती मिळवलेले प्रकाशक, 'श्री विद्या प्रकाशन'चे संस्थापक (जन्म: २३ आक्टोबर १९२३)
२०००: विनायक सदाशिव तथा वि. स. वाळिंबे लेखक व पत्रकार (जन्म: ११ ऑगस्ट १९२८)
२००९: लक्ष्मण देशपांडे 'वर्‍हाड निघालंय लंडनला' साठी प्रसिद्ध असलेले लेखक, दिग्दर्शक व प्राध्यापक (जन्म: ५ डिसेंबर १९४३)
२००९: डॉ.लक्ष्मण देशपांडे, मराठी लेखक, दिग्दर्शक व कलाकार.

cmyk

# हॉटेल बंजारासह स्विफ्ट गाडीवर कारवाई

## ४ लाख ८८ हजारचा मुद्देमाल जप्त



अंबड। प्रतिनिधी

पोलीस ठाणे अंबड हद्दीत एका खाजगी व्यक्ती गोपनिय माहिती मिळाल्यावर अंबडचे इन्चार्ज पोलीस अधीक्षक सिद्धार्थ बारवाल यांना माहिती मिळाली होती यावरून हॉटेल बंजारा येथे बेकायदेशीर दारुची विक्री चालू असल्याची माहीती मिळाल्याने कारवाई कारवाई करण्यात तसेच दुसरी कारवाई स्विफ्ट वाहन गाडीमध्ये तपासणी केली असता यामध्ये चार लाख ७० हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मा.परिविक्षाधिन पोलीस अधिक्षक सिध्दार्थ बारवाल यांच्या आदेशावरून अमोल गुरले व पो.ह.१११८/विष्णु चव्हाण, पो.ह.१२७२/दिपक चव्हाण, पो.शि ३४४/मुंडे, पो.शि. ४७/भिसे यांनी हॉटेल बंजारा येथे दोन पंचासमक्ष रेड केली असता सदर ठिकाणी विविध कंपनीच्या १७.४७०/- रुपयेच्या विदेशी दारु बाटल्या मिळुन आल्या. सहा.पोलीस निरीक्षक अमोल गुरले यांच्या फिर्यादीवरुन हॉटेल बंजारा चालक मालक सनी संजय राठोड वय २७ वर्षे रा. चांगले नगर, अंबड याने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त ड्राय डे असतांना देखील मा. जिल्हाधिकारी यांनी घालुन दिलेल्या नियमांचे उल्लंघन करुन हॉटेलवर विनापरवाना व बेकायदेशीररित्या प्रोव्हीवेशन गुन्हयाचा माल ताव्यात व कब्ब्यात बेकायदेशीर बाळगुन तीची चोरटी विक्री करीत असतांना मिळुन आला म्हणून पो. ठाणे अंबड गु.र.क्र. ९६/२०२५ कलम ६५ (अ) (ई) म. दा. का सह कलम २२३ भा.न्या.से अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक मा.श्री अजय कुमार बंसल ,विशाल खांबे उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, मा. परिविक्षाधिन पोलीस अधिक्षक सिध्दार्थ बारवाल यांच्या आदेशावरून धडाकेबाज कारवाई करण्यात आली .तसेच दुसरे कारवाई पण करण्यात आली एक इसम पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कार मध्ये विनापरवाना बेकायदेशीररित्या प्रोव्हीबेशन गुन्हयाचा माल देशी व विदेशी दारुची चोरटी विक्री करण्याकरीता देशी रोडने जात आहे अशी माहीती मिळाल्याने सदरबाबत कारवाई मा. परिविक्षाधिन पोलीस अधिक्षक सिध्दार्थ बारवाल आदेशान्वये मदिना चौक अंबड येथे जावुन संशयीत पांढऱ्या रंगाची स्विफ्ट गाडी अडवुन तिची झडती घेतली असता त्यामध्ये प्रो. गुन्हयातील देशी विदेशी २४४४०/-रुपयेच्या दारु बाटल्या मिळुन आल्या तसेच बेकायदेशीर दारु बाळगणाऱ्या भाऊसाहेब सखाराम लहामंगे वय ३७ वर्षे रा. डोमेगाव ता.अंबड याचे अंगझडतीमध्ये ४६,२००/- रुपये व गुन्हयात वापरण्यात आलेली पांढऱ्या रंगाची स्विफ्ट कार क्र. एम एच ४८ एफ २०२६ कि.अं ४,००,०००/- रुपये असा एकुण ४,७०,६४०/- रुपयेचा मुद्देमाल मिळुन आला याबाबत पोलीस ठाणे अंबड गु.र.क्र. ९७/२०२५ कलम ६५ (अ) (ई), ८३ म.दा.का अन्वये भाऊसाहेब सखाराम लहामंगे ,दिलीप साहेबराव खांडेभराड वय २६ वर्षे दोन्ही रा. डोमेगाव ता. अंबड सदरच्या कारवाईमुळे हॉटेल धाब्यावाल्यांची झोप उडाली

**जहिरनामा**

**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**अंबाजोगाई येथील श्री.एस.डी. मेहता, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, यांचे न्यायालयात**

**किरकोळदिवाणी अर्ज क्र. ११८/२०२५**

**शंकर वि. निरंक**

अर्जदारः १. शंकर दगडु वैद्य, वय. ८० वर्षे, धंदा शेती रा. घाटनांदूर, ता. अंबाजोगाई जि. बीड. २. कमलबाई माणिकराव होळकर, वय. ७४ वर्षे, धंदा घरकाम रा. जवळगाव, ता. अंबाजोगाई जि. बीड. ३. बळीराम दगडु वैद्य, वय. ६९ वर्षे, धंदा शेती रा. घाटनांदूर, ता. अंबाजोगाई जि. बीड. ४. मंजा दगडु वैद्य, वय. ५७ वर्षे, धंदा शेती रा. घाटनांदूर, ता. अंबाजोगाई जि. बीड.

विरुदध निरंक

ज्यापेक्षा, अर्जदार क.१ ते ४ चे वडील मयत नामे दगडु पाराजी वैद्य हे दिनांक २६/१२/२०१५ हे मयत झाले आहेत. यांच्या मृत्यू पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणुन अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कारणासाठी ते मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्राची आवश्यक्ता आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखे पासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेख्यावरच असे कळविण्यात येते की. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत्ती न दाखवल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार हयांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देईल पुढील तारीख २८.३.२०२५ नेमुण देण्यात आलेली आहे. आज ता. २१ माहे ०२ सन २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिकन्या निशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरित
**सहा. अधिक्षक**
दि.न्या.क.स्तर, अंबाजोगाई

स्वाक्षरित
**क लिपीक**

(शिक्का)

# राष्ट्रीय महामार्ग वृक्षतोडीमुळे वाटसरूंची शितल सावली हरवली

## रस्ते विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा –हास

## पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडेनी वनक्षेत्र व हरित क्षेत्र वाढीसाठी पुढाकार घ्यावा

बीड। प्रतिनिधी

मराठवाड्याचे हरितछत्र अवघ्या ५ व बीड जिल्ह्याचे २.५ टक्क्यांवर आलेले असताना केंद्र आणि राज्य शासनाच्या विकास धोरणानुसार महामार्ग रूंदीकरणाच्या कामांमुळे भविष्यात गतिमान अशी दळणवळण व्यवस्था तयार व्हावी यासाठी रस्ते, महामार्ग रूंदीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत.रस्ते विकासाच्या नावाखाली रस्ते विकास महामंडळाने धुळे ते सोलापूर व बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील शेकडो वर्षापुर्वीची चिंच ,वड, कडुनिंब,पिंपळ, औदुंबर सारख्या झाडांची अक्षरक्ष: कत्तल करण्यात आली असुन नियमानुसार तोडलेल्या झाडांच्या दहापट झाडे लावण्याची जबाबदारी रस्ते विकास महामंडळावर असतानाही याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला जात आहे. महामार्गावरील दोन बाजुंना दुतर्फा असलेल्या जुनाट वटवृक्षांची अभेद्य



तटबंदी आणि ईतर अनेक प्रकारच्या वृक्षांची विपुलता असल्याने महामार्गावर प्रवास करताना वाहनचालक व प्रवाशांना आल्हाददायक वातावरणाची अनुभुती मिळत असे मात्र आता महामार्ग रूंदीकरणाच्या कामांमुळे वृक्षतोड झाल्याने वाटसरूंची सावली सुद्धा हिरावली आहे.याबद्दल वृक्षप्रेमी आणि पर्यावरण प्रेमींकडुन नाराजी व्यक्त केली जात असुन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना लेखी तक्रार करत वनक्षेत्र व हरित क्षेत्र वाढीसाठी पुढाकार घेण्याची मागणी केली आहे.

बीड जिल्ह्यात २.४ टक्के ईतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट ओढावत आहे. झाडांच्या मुळांमुळे जमिनीची धुप नियंत्रण राहते.वृक्षतोडीमुळे जमिन नापिक होऊन जैवविविधता कमी होते. वृक्षतोडीमुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडची पातळी वाढते ज्यामुळे तापमान वाढते आणि ग्लोबल वार्मिंगचा धोका वाढतो .जंगलामध्ये अनेक प्राणी पक्षी आणि वनस्पतींचे निवासस्थान असते वृक्षतोड झाल्यामुळे त्यांच्या निवासस्थानाचा नाश होतो आणि त्यांचे जीवन धोक्यात येते त्यामुळे अनेक प्रजाती नामशेष होण्याची शक्यता वाढते. झाडे पाण्याचे संचयन आणि वितरण नियंत्रित करतात .वृक्षतोड झाल्यामुळे पर्जन्यचक्रावर परिणाम होतो, ज्यामुळे पाऊस कमी होण्याची शक्यता वाढते.आणि दुष्काळाचे प्रमाण आवडते .झाडे हवेतील हानिकारक घटक शोषून घेतात आणि स्वच्छता हवा उपलब्ध करून देतात .वृक्षतोड झाल्यानंतर हे प्रदूषण वाढते त्यामुळे मानवाचे आरोग्य धोक्यात येते वृक्षतोडीमुळे या सर्व परिणामांचे संघ पर्यावरणाच्या संतुलनावर मोठा परिणाम करतो पर्यावरणाच्या दीर्घकाळ टिकाऊपणासाठी वृक्षतोड कमी करणे आणि जास्तीत जास्त झाडे लावणे आवश्यक असते.पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी शासनाकडून ''झाडे लावा झाडे जगवा'' म्हणत कोट्यावधींचा खर्च कागदोपत्रीच करण्यात येत असल्याचे दिसून आले आहे. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढीसाठी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा

जालना। प्रतिनिधी

शासनाकडून कौटुंबिक हिसाचारापासून महिलांच्या संरक्षणासाठी अधिनियम २००५ कायदा तयार करण्यात आला आहे. या कायद्यातंर्गत आपल्या कार्यक्षेत्रातील न्यायदंडाधिकारी यांच्याकडे आपण संरक्षण अधिकारी यांच्यामार्फत अर्ज करू शकता. या कायद्यात तुमच्या किंवा तुमच्या मुलांविरूध्द होणारे कौटूंबिक अत्याचार तुम्ही थांबवू शकता. प्रतिवादी कडून तुमचे स्त्रिधन, दाग दागीने, कपडे, कागदपत्रे इत्यादी हस्तगत करू शकता. तुम्ही ज्या सहभागी घरात राहत होता त्या घरात राहण्याचा आपला हक्क आहे. तुमचे सहभागी घर हस्तांतरीत करण्यास किंवा विकण्यास पायबंद घालु शकता. प्रतिवादीकडून आपल्याला आणि आपल्या मुलांना उपजिवीकेसाठी अर्थ सहाय्य मिळवू शकता. मोफत कायदे विषयक सल्ला केंद्र, सेवा पुरविणाऱ्या संस्था, वैद्यकिय सुविधा, निवारगृह, आवश्यक त्या सेवा सुविधा प्राप्त करून घेवु शकता.सदर कायद्यान्वये खालील प्रमाणे आदेश मिळवू शकता कलम १७- सहभागीत घरामध्ये राहण्याचा हक्क मागु शकता. कलम १८- कोणत्या प्रकारचा हिंसाचार होऊ नये यासाठी संरक्षण आदेश. कलम १९- निवासासाठीचा आदेश मिळवू शकता. कलम २०- उपजिवीकेसाठी अर्थसहाय्याचा आदेश मिळवू शकता. कलम २१- यामध्ये आपली अज्ञानपालक मुलांचा ताबा मिळवू शकता. कलम २२- हिंसाचारामध्ये झालेल्या नुकसानीची भरपाई मागू शकता. अधिक संपर्कासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, तळ मजला जालना येथे किंवा कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधावा.

# विद्यार्थ्यांना दप्तरांच्या बॅग व खाऊ वाटप

चांदेगाव। प्रतिनिधी

१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव जगभरात जल्लोषात साजरा होत असताना बीड तालुक्यातील चांदेगावच्या सुकन्येने आपला वाढदिवस जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरांच्या बॅग व खाऊ वाटप करून साजरा केला.

सध्या हैद्राबाद येथे नोकरी करत असलेली सुप्रिया ढास - खामकर हिने आपण ज्या जन्मभूमीत शिक्षण घेतले तिथले ग्रामीण भागातील विद्यार्थी यांच्याप्रति आत्मियता बाळगत विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून स्वतःचा वाढदिवस अशाप्रकारे आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. जि. प. प्रा. शाळेतील शिवजयंती



व वाढदिवस या दुहेरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. विलास कोल्हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून पंकज शिंदे, प्रा. विठ्ठल शिंदे, बाप्पा हावळे, परमेश्वर खामकर, अंकुश ढास, विक्रम कोल्हे तसेच शाळेचे शिक्षक प्रशांत सुरवसे, धनराज सातपुते व प्रवीण पवार उपस्थित होते. सुप्रियाच्या ह्या आगळ्यावेगळ्या उपक्रमाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

**जाहीर प्रगटन**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**

**जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

npghansawangi@gmail.com PH. No. ०२४८३-२७१७८७

**जा.क्र.२०२४/नपघ/जा.प्र./कावी- ४०८ दिनांक:-२१/०२/२०२५**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सुशिला साहेबराव सुरडकर रा. आवलगाव खुर्द ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे शेख अय्युब शेख मन्नु रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २८८६ दि. १९/०८/२०२४ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं २६७६ दिनांक: २८/०८/२०२४ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे शेख अय्युब शेख मन्नु रा. ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५४० मधील एकुण क्षेत्र ४१.८२ चौ. मी नावे करणेस्तव ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- खरेदी विक्री संघाची जागा, पश्चिम :- सरकारी रोड

दक्षिण :- सुलतानाबी हमजा शेख यांनी आज रोजी केलेली जागा

उत्तरेस : कदीर अतार याची जागा या वरील चतुः सिमा मधील ४१.८२ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

(शिक्का)

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसावंगी

# बेरोजगारांसाठी मंगळवारी भरती मेळाव्याचे आयोजन

जालना। प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि हुतात्मा जनार्दन मामा नागापुरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. २५ फेब्रुवारी,२०२५ रोजी जालना येथील हुतात्मा जनार्दन मामा नागापुरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यासाठी जवळपास १७५ पेक्षा अधिक रिक्त पदे उपलब्ध होणार आहेत. तरी या दोन्ही मेळाव्याचा नोकरीस इच्छुक असलेल्या उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी माहिती दिली आहे.रोजगार कार्यालयाकडील नोंदणीकृत सुशिक्षित महिला व पुरुष उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी सहाय्य होण्याच्या दृष्टीने हा रोजगार मेळाव्या तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

# शिवबांवर जिजाऊंनी सामाजिक समतेचे संस्कार केले – प्रा. बबन झांजे

पाटोदा। प्रतिनिधी

सामाजिक समता व स्त्रियांना आदराचे व सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे संस्कार जिजाऊंनी शिवाजी महाराजांवर बालपणापासून केले होते म्हणूनच शिवाजी महाराज हे एक न्यायप्रिय राजे म्हणून भारतातच नव्हे तर जगात प्रसिद्ध आहेत असे प्रतिपादन परळी (वै.) स्थित नवगण महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. बबन झांजे यांनी केले. शिवजयंती निमित्त येथील वसंतनदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २१ फेब्रुवारी रोजी आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, डॉ. सतिश माउलगे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. शरद पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या



ऐतिहासिक पार्श्वभूमीचे थोडक्यात विवेचन केले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित या विशेष व्याख्यानात प्रा. बबन झांजे पुढे म्हणाले की, ऐतिहासिक घटनांचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की भोसले कुळाचा इतिहास हा कुळातील स्त्रियांच्या कर्तृत्वाचा इतिहास आहे. तात्कालीन मोघलकालीन राजवट ही जाचक व स्त्रियांवर तसेच रयतेवर अन्याय करत होती. या अन्यायाच्या विरोधात उभे राहून स्वराज्यनिर्मितीचे बाळकडू जिजाऊंनी शिवबांना बालपणापासून पाजले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य हांगे म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या महान कार्याचा आदर्श युवकांनी डोळ्यासमोर ठेवावा व त्यांच्या न्यायप्रियतेचे अनुकरण करावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभार प्रा. मनिषा गाढवे यांनी मानले. व्याख्यानास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

**जाहिर प्रगटन**

**मा. श्रीमती पी डी नव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क, स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३२९/२०२५**

**ॲड ए.एस.ठोसर**

**राजेंद्र पि. शेषेराव ढेंगे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार : १. राजेंद्र पि. शेषेराव ढेंगे, वय-५० वर्षे, धंदा-शेती रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड २. उध्दव पि. शेषेराव ढेंगे, वय-४२ वर्षे, धंदा-शेती रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड ३. कालिंदा भ्र. भास्कर ढवळे, वय ६५ वर्षे, धंदा-घरकाम रा. चौदसवाडी, ता. जि. बीड (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शेषेराव पि. रावजी ढेंगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअथी शेषेराव पि. रावजी ढेंगे यांचा मृत्यु दिनांक ०२.१०.२०२२ रोजी राहते घरी मौजे कोल्हारवाडी, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ व २ हे मयताचे मुले व अर्जदार क ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताची पत्नी व आई, वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. हे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शेषेराव पि. रावजी ढेंगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २१ फेब्रुवारी माहे २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५ एप्रिल २०२५.**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
**क लिपीक**

(शिक्का)

**जाहिर प्रगटन**

**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३०७/२०२५**

**रूक्मीण भ्र. विठ्ठल ईनामदार व इतर विरूध्द निरंक**

अर्जदार : १. रूक्मीण भ्र. विठ्ठल ईनामदार, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, २. सखाराम पि. विठ्ठल ईनामदार, वय ५२ वर्षे, धंदा शेती, ३. रमेश पि. विठ्ठल ईनामदार, वय ५० वर्षे, धंदा शेती, ४. भिवाजी पि. विठ्ठल ईनामदार, वय ४८ वर्षे, धंदा शेती, ५. आसाराम पि. विठ्ठल ईनामदार, (मयत) वारस ५-अ मांकाबाई भ्र. आसाराम ईनामदार, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, ५-ब शिवाजी पि. आसाराम ईनामदार, वय ४८ वर्षे, धंदा शेती, ५-क बाळु पि. आसाराम ईनामदार, वय ३४ वर्षे, धंदा शेती, वरील सर्व रा. मानुकरवाडी, ता.जि. बीड

विरुध्द कोणीही नाही.

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत विठ्ठल पि. मारोती ईनामदार, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत विठ्ठल पि. मारोती ईनामदार, यांचा मृत्यु दिनांक १०/१०/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत विठ्ठल पि. मारोती ईनामदार, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत विठ्ठल पि. मारोती ईनामदार, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २०/०२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०३/२०२४ आहे.**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
**क लिपीक**

(शिक्का)

# म.चिंचोली येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती

## बंदोबस्तातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या हस्ते महाआरती

## तीन दिवशी व्याख्यानमालेचे केले होतो आयोजन

घनसावंगी। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त तालुक्यातील मच्छिद्रनाथ चिंचोली येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा अभूतपूर्व असा सोहळा पार पडला.सायंकाळी ६ ला गावातुन भव्य दिव्य टाळ मुर्दुग व घोषणेस दिलेल्या प्रतीसादाने वातावरणात एक नवीन स्फूर्ती निर्माण झाली होती.गल्लीतील महिलांनी रांगोळी सह आरतीच्या ताट सजले होते फटाक्याच्या अतिश बाजीच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पालखी सह भव्य शोभायात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नामाचा गजर करत टाळ मृदंगाच्या ठेका धरत भजन, फुगडीमध्ये उत्स्फूर्तपणे हजारोंनी सहभाग घेतला तरूणांनी शिवरायांचा जयजयकार केला ९ च्या सुमारास शिवजन्मोत्सवाचा नेत्रदीपक सोहळा पार पडला हा सो-हळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी हजारो शिवभक्तांनी गर्दी केली होती मच्छिद्रनाथ मंदिर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा पाळणा सोहळा संपन्न झाला.यावेळी पाळणा झुलवण्यात आला. 'झुलवा पाळणा, बाळ शिव-ाजीचा, चंद्र जसा हा इंद्र शोभतो, पुत्र जिजाऊचा, झुलवा पाळणा, बाळ शिवाजीचा, आज उगवला सूर्य नभी नव्या नवलाईचा, 'झुलवा पाळणा, बाळ शिवाजीचा या पाळणा गीताने हजारो शिवभक्तांनी छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली.

सार्वजनिक शिवजन्मोत्सव म. चिंचोली



च्या वतिने मागील एक महिन्यापासून या कार्यक्रमाचे नियोजन सुरु होते. यात दि.१६ रविवार ह.भ.प.आश्विनीताई महाराज कदम यांचे कीर्तन झाले दि १७ सोमवार अँड आशाताई पाळीकराव यांचे व्यसन मुक्ती या विषयावर व्याख्यान झाले तर दत्ता महाराज टरले यांचे भारुड झाले दि.१८ मंगळवार .दिपक राखुंडे (प्रसिद्ध कवी) यांचे कवी संमेलन झाले नंतर शिवश्री रामेश्वर मोटे पाटील यांचे व्याख्यान झाले या तीन दिवसाच्या व्याख्यान मालेमध्ये व्याख्यानाने शिवाजी महाराजांच्या जीवन, कार्य आणि त्यांच्या योगदानाबद्दल विस्तारपूर्वक व्याख्याने दिली.युवा तरुनांना मोलाचे मार्गदर्शन झाले दि.१९ बुधवार सकाळी ९ वा.प्रतिमा पूजन व ओजस मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल आरोग्य तपासणी शिबीर झाले या मध्ये १५० रुग्णाची तपासणी करण्यात आली पुढील उपचाराचे मार्गदर्शन करण्यात आले छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळ्याच्या भोवती उभारलेला भगवा शामियाना सर्वांचे लक्ष वेधून घेत होता संपूर्ण पुतळ्याच्या परिसराला आकर्षक फुलांनी सजवण्यात आलेलं होतं या पुतळ्याच्या समोरच पाळणा सजवून ठेवण्यात आला होता.त्यात बाळशिवबांची मूर्ती ठेवण्यात आली होती बाळशिवबाचे हे रुप आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात टिपण्यासाठी प्रयत्न केले जात होते बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस कर्मचारी सह महिला कर्मचारी यांच्या हस्ते पाळणा हलवून कार्यक्रम पार पडला नंतर यांच्या हस्ते महाराजांची महा आरती झाली हा सोहळा पार पडल्यानंतर हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेले शीवभक्त अंत्यत शांततेत परतले.

# स्वारातीच्या परिचारिकांचे काम बंद आंदोलन

## शासन निर्णयानुसार परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दि ३१.१२.२०२४ रोजी सन २०२४–२०२५ निवड सूची वर्षात पदोन्नती कार्यवाही जलद गतीने करण्याबाबत परिपत्रके काढले आहे. त्यानुसार मुख्यमंत्री यांनी १०० दिवसाच्या कार्यक्रमात सर्व राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नतीची कार्यवाही जलद गतीने करण्याबाबत निर्देश दिले आहेत.परंतु वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे सेवा प्रवेश नियम मंत्रालय स्तरावर प्रलंबित असल्या कारणामुळे परिचर्या संवर्गातील सर्वंकष पदांची पदोन्नती मागील अनेक वर्षांपासून रखडलेली आहे.या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी दि २० रोजी काम बंद आंदोलन पुकारण्यात आले होते. या काम बंद आंदोलनात स्वा रा ती चे सर्व परिचारक तथा परिचारिका सहभागी झाले होते.

पाठ्यनिर्देशिका तसेच विभागीय परिसेविका, सार्वजनिक आरोग्य निर्देशिका, सहाय्यक अधिसेविका, अधिसेविका या पदांची देखील पदोत्रती रखडलेली आहे. पदोन्नती या सेवाजेष्ठतेच्या आधारेच करावी




अशी संघटनेची आग्रही भूमिका आहे.संघटनेतर्फे अनेक वर्षांपासून या पदाच्या पदोन्नतीसाठी पत्रव्यवहार तसाच बैठकीद्वारे चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयन केलेला असूनही सदर पदोन्नत्या प्रलंबितच आहेत. त्यामुळे परिचर्या संवर्गामध्ये संतप्त भावना निर्माण झालेल्या आहेत. अखेर परिचारिकांना न्याय देण्यासाठी आंदोलनात्मक पवित्रा घेण्यात आला असून दि. २०.०२.२०२५ रोजी एक दिवसाचे काम बंद आंदोलन पुकारण्यात आले होते. परिचर्या संवर्गाच्या सर्वंकष पदोन्नती ही महत्त्वाची मागणी आहेच तसेच परिचारिकांना मिळणारे भत्ते विशेषत: परिचर्या भत्ता, ग्रामीण रुग्णालयातील परिसेविका पद पुनर्जीवित करणे, बंधपत्रित परिचारिकांचा सेवा कालावधी नियमित करणे, बक्षी समिती खंड–२ मध्ये परिचर्या संवर्गावर झालेला अन्याय दूर करणे, परिविक्षा कालावधीसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेमधून अधिपरिचारिका पद वगळावे या आणि इतर देखील अनेक मागण्या आहेत. परीचार्यांनी पुकारलेल्या एक दिवसीय काम बंद आंदोलनाची दखल शासनाने न घेतल्यास यानंतर बेमुदत संपाचा आंदोलनात्मक पवित्रा घेण्यात येईल अशी भावना या ◂◂ पान ३ वर

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**माजलगाव । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विभाग व सुंदर रत्न करिअर अकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने शिवचरित्रावर आधारित राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा घेण्यात आली.विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरीत करण्यात आले.यामध्ये साधना टाकणखार हिने प्रथम पारितोषिक पटकावले.




सुंदरराव सोळंके महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने मागील सात वर्षापासून राष्ट्रीय व राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात येते. यावर्षी स्पर्धेसाठी विविध महाविद्यालयातील स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.स्पर्धेचे पारितोषिक वितरणाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जी. के. सानप होते तर प्रमुख पाहुणे श्री. सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी होते.यावेळी उपप्राचार्य डॉ.एन.के.मुळे, उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, इतिहास विभागप्रमुख प्रा.बालाजी बोडके, प्रा.सुदर्शन स्वामी,डॉ.गोवर्धन फसले, प्रा.अलझेंडे यांची प्रमुख उपस्थिती ◂◂ पान ३ वर

# श्री संत गजानन महाराज प्रगटदिन अंबाजोगाईत उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संत शिरोमणी शेगाव निवासी संत श्री गजानन महाराज यांचा प्रगट दिन अंबाजोगाईत गजानन महाराज भक्त गणांच्या वतीने गुरूवारी उत्साहात साजरा करण्यात आला. शहराच्या चौसाळकर वसाहत भागातील श्री संत शिरोमणी गजानन महाराज यांच्या मंदिरात श्रीच्या मूर्तीस रुद्राभिषेक, इतर धार्मिक कार्यक्रम तसेच ह.भ.प.आत्माराम शास्त्री यांचे किर्तन होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने हौसिंग सोसायटी भागातील दत्त मंदीरात रुद्राभिषेक तसेच ह.भ.प.प्रज्ञाताई रामदासी यांचे किर्तन व महाप्रसाद आणि इतर धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. नागझरी (सरस्वती वसाहत) भागातील संत गजानन महाराज मंदिरातही रुद्राभिषेक,पारायण आणि ह.भ.प.महारुद्र महाराज खाडे यांचे किर्तन झाले आणि उपस्थित भक्तांना महाप्रसाद देण्यात आला.

संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनी सर्वत्र महिला,भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीसाठी आयोजित बैठकीला उपस्थित रहावे - महादेव धांडे

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने संघटनात्मक बांधणी आणि सदस्य नोंदणी अभियानाचा संदर्भात कार्यकर्ता व पदाधिकारी यांच्या बैठकीचे शनिवार दि. २२ फेब्रु रोजी दुपारी एक वाजता आयोजन करण्यात आले असून पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्यासह मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी बीड शहर व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आजी माजी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहवे असे आवाहन कार्यालय सरचिटणीस महादेव धांडे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्यता नोंदणी अभियान सुरू असून बीड तालुका व शहर संघटन बांधणी आणि सदस्य नोंदणी अभियानाच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ता व पदाधिकारी यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हा कार्यालय, मित्र नगर चौक, बीड येथे शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी दुपारी एक वाजता होणाऱ्या या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित, माजी आमदार संजय दौंड, जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण, परळी नगर परीषदेचे गटनेते अजय मुंडे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, बीड विधानसभा क्षेत्र अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, बबनराव गवते यांच्यासह मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सदस्यता नोंदणी अभियानाचा प्रारंभ होणार या बैठकीला बीड शहर व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आजी माजी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन कार्यालय सरचिटणीस महादेव धांडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

# बीडचा आदित्य मध्यप्रदेशात चमकला

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र रग्बी फुटबॉल संघात प्रतिनिधित्व करणारा आदित्य ऋषिकांत तांदळे हा मूळ आंबील वडगाव ता. जि. बीड.गावचा आहे. तो परभणी केसापुरी गावच्या मातीत लहानाचा मोठा झाला त्याचे प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषद बाळापुर या ठिकाणी झाले नंतर माध्यमिक शिक्षणासाठी श्री शिवाजी विद्यालय बीड येथे झाले तेथेच त्याला रग्बी फुटबॉल मध्ये करिअर करण्याचा मार्ग सापडला व मार्गदर्शक लाभले नितीन येळवे सर.



डिसेंबर २०२२ मध्ये प्रथम १४ वर्षे वयोगटात त्याची राष्ट्रीय शालेय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली व राष्ट्रीय स्पर्धा गुजरात अहमदाबाद येथे पार पडल्या तदनंतर डिसेंबर २०२४ मध्ये पुन्हा शालेय राष्ट्रीय रग्बी फुटबॉल स्पर्धेसाठी १७ वर्ष वयोगटांमध्ये महाराष्ट्राच्या संघात निवड झाली व स्पर्धा बिहार पटना या ठिकाणी पार पडल्या या स्पर्धेत महाराष्ट्र संघाला ब्रांझ ३ पदक प्राप्त झाले. जानेवारी २०२५ मध्ये १५ वर्षे वयोगटात राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली व स्पर्धा मध्यप्रदेश ग्वाल्हेर येथे संपन्न झाल्या या स्पर्धेत महाराष्ट्र संघाला ब्रांझ पदक प्राप्त करून देण्यास विशेष योगदान दिल्याबद्दल हार्दिक अभिनंदन या यशाने देशात महाराष्ट्राची मान नक्कीच उंचावली आहे. संघाची मेहनत जिद्द चिकाटी प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र संघाने केलेली ही कामगिरी प्रत्येक माणसाच्या हृदयात अभिमान निर्माण करणारी आहे सोबतच बीड जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. आदित्यने पाच वर्षाच्या काळात तीन राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला आहे. त्यामुळे आता त्याची आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या सराव शिबिरास निवड झाली आहे त्यामुळे गावच्या भूमिपुत्राचा सत्कार म्हणून शिवजयंतीचे औचित्य साधून त्याचा सत्कार करण्यात आला व आंतरराष्ट्रीय स्पर्धे सहभागी होऊन बीड जिल्ह्याची मान उंचावी यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# चुंबळी फाटा मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या बसगाड्या पाटोदा शहरातून सोडण्याची मराठी पत्रकार परिषदेची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा हा तालुक्याचे ठिकाण असुन सुध्दा पाटोदा आगारात अनेक बसगाड्या न येता चुंबळीफाटा येथुन बसेस जातात त्यामुळे प्रवाशांच्या हेडसांड होत असुन वारवार मागणी करूनही दुर्लक्ष होत असल्याने मराठी पत्रकार परिषद पाटोदा शाखेच्या वतीने आंदोलनाचा इशारा दिला आहे. पाटोदा शहर २०हजार लोकसंख्येचे पाटोदा शहर मोठे असुन देखील पाटोदा बसस्थानकात या बस येत नसल्याने याचा फटका प्रवाशांना सहन करावा लागत आहे.चुंबळीफाटा येथुन जाणारे विविध आगाराचे ५०गाड्या पुणे, बीड, धारुर , उमरखेड, यवतमाळ,जालना, चिपळुण या ठिकाणी जातात त्यातील लांब पल्ल्याच्या बसगाड्या पाटोदा बसस्थानकात येण्याचे बंधनकारक करावे.तसेच पाटोदा बसस्थानकात रात्री नियंत्रक नसतात त्यामुळे आगारात रात्री काही अनुचित प्रकार घडू शकतात त्यामुळे रात्री नियंत्रकाची नियुक्ती करण्यात यावी वरील मागण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घ्यावा नसता ३मार्च रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण मराठी पत्रकार परिषद शाखा पाटोद्याच्या वतीने आपल्या बसस्थानकात उपोषण करण्यात येईल असा इशारा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात आला.



यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष अजय जोशी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष कादर मकराणी,मराठी पत्रकार परिषदेचे तालुका कार्याध्यक्ष सोमनाथ खंडागळे,सचिव हमीद पठाण, तालुका उपाध्यक्ष जावेद शेख, अशोक भवर,हल्ला कृती समिती तालुका अध्यक्ष संजय सानप, कोषाध्यक्ष दत्ता देशमाने,सतिश गर्जे,आदी उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त शिवसंग्रामच्यावतीने ''छावा'' चित्रपटाचे २५ फेब्रुवारी रोजी विशेष मोफत आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

''छत्रपती शिवाजी महाराज'' यांच्या जयंती निमित्त शिवसंग्राम च्या वतीने महिला , विद्यार्थी आणि शिवसंग्राम पदाधिकारी यांच्यासाठी शौर्य आणि धैर्याचे मूर्तीमंत प्रतीक छत्रपती संभाजी राजांच्या जीवनावर आधारित ''छावा'' चित्रपटाचे २५ फेब्रुवारी रोजी विशेष मोफत आयोजन. करण्यात आले आहे. असे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी सांगितले आहे.

**महिला, विद्यार्थी, आणि शिवसंग्राम पदाधिकारी यांच्यासाठी खास मोफत शो**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सध्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित गाजत असलेल्या ''छावा'' चित्रपटाचे महिला , विद्यार्थी , तरुण आणि शिवसंग्राम पदाधिकारी यांच्यासाठी मोफत शो आयोजन करण्यात आले आहे. हा चित्रपट युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित असून महाराष्ट्रातील शिवभक्तांमधून त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले व या भूमीत जन्मलेल्या या दोन्ही महाराजांनी अखंड हिंदुस्तानचा इतिहास रचला आहे.या चित्रपटाच्या माध्यमातून लोकांना छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवन आणि त्यांचा संघर्ष अनुभवता यावा त्याचबरोबर महिला , विद्यार्थ्यांना संभाजी महाराजांचा जीवनपट मोठ्या पडद्यावर पाहता यावा या करिता आपण हा चित्रपट शिवसंग्रामच्या माध्यमातून दाखवणार आहोत असेही ज्योती मेटे यांनी म्हटले आहे.

# जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत डॉ. गणेश मुडेगांवकर प्रथम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, पुणे यांच्या तर्फे दरवर्षी राज्यस्तरीय नवोक्रम स्पर्धा घेण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२४- २५ साठी घेण्यात आलेल्या नवोपक्रम स्पर्धेमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक गटामधून येथील रहिवासी डॉ.गणेश अनंतराव मुडेगावकर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर यांचा नवोपक्रम जिल्हास्तरावर सोलापूर जिल्ह्यात प्रथम आला आहे. ''इयत्ता बारावी इंग्लिश विषय विद्यार्थ्यांचे वस्तुनिष्ठ प्रश्न निर्मिती कौशल्य आणि लेखन कौशल्य विकसन'' यासाठी हा नवोपक्रम घेण्यात आला होता. हा उपक्रम जिल्हास्तरावरती प्रथम ठरला आहे. या उपक्रमासाठी सहकारी शिक्षक तेजश्री तळे, कोमल कोंडा, मल्लिकार्जुन पाटील आणि शिवराज देसाई यांचे मोलाचे सहकार्य लाभले. डॉ.मुडेगावकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# दीपस्तंभ गुरुकुल म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला अंधार दूर करणारा दीप-प्रा.अशोक खेत्री

वडवणी । प्रतिनिधी

दीपस्तंभ गुरुकुल वडवणी येथे दिनांक १९ फेब्रुवारी निमित्त हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दीपस्तंभ गुरुकुल येथे विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सामान्य ज्ञान स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, वकृत्व स्पर्धा घेण्यात आल्या होत्या वकृत्व स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास प्रमाणपत्र व बक्षीस देऊन विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात ◂◂ पान ३ वर




# जगात सर्वात मोठे दैवत आई-वडील आहेत,मुलांनी विशेषत : मुलींनी जिवंतपणे आई-वडिलांची इज्जत जपावी-प्रा.वसंत हंकारे

आष्टी । प्रतिनिधी

जोपर्यंत आई-बापाचा श्वास सुरू आहे,तोपर्यंत आई-बापाच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करा,आई-बाप गेल्यावर कोणत्याही देवाच्या चरणी लाखो रुपये ओतले तरी तो आपले आई-वडील परत देऊ शकत नाही,असे प्रतिपादन व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांनी केले.

आष्टी येथील पंचायत समिती प्रागाणात गुरूवार (दि.२१ रोजी युवानेते राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्ताचे औचित्य साधत महाराष्ट्राचे प्रमुख व्याख्याते प्रा.वसंत हंकारे यांचे भरकटलेली तरूणाई व न समजलेले आई-बाप समजून सांगताना ते बोलत होते.यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर,माजी जि.प.सदस्य देविदास धस, महाराष्ट्र सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे,माजी पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप,तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर हंबर्डे, मुर्शदपुरचे सरपंच अशोक मुळे,आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,सुमतीलाल मेहेर, ॲड. बाळासाहेब मोरे,अतुल मेहेर यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलतांना प्रा.हंकारे म्हणाले,कोणत्याही मुलीने खोट्या प्रेमाच्या जाळ्यात फसू नये,जिवापाड प्रेम करणाऱ्या आई-वडिलांची मान खाली जाणार नाही,याची काळजी घ्यावी.आई-बापासारखे खरे प्रेम आपल्यावर जगात कोणीच करू शकत नाही.मुलांना घडविण्यासाठी आणि त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आपला बाप ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता अहोरात्र कष्ट करीत असतो.स्वतः फाटके कपडे घालून मुलांना ब्रॅन्डेड कपडे देणारा बापच असतो. बापाची किंमत काय असते,हे अनाथाश्रमातील मुलांना विचारा,असेही हंकारे म्हणाले.या कार्यक्रमासाठी महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.



# केव्हीके वैज्ञानिक सल्लागार समितीची बैठक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्र अंबाजोगाई यांची ३६ वी वैज्ञानिक सल्लागार समिती बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रकल्प संचालक डॉ. उपेंद्र कुलकर्णी यांची उपस्थिती होती. बैठकीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. गिरीधर वाघमारे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्षनाथ ससाने, अटारी प्राधान संशोधक डॉ. सय्यद शाकेर अली, आत्मा प्रकल्प उपसंचालक सुरज पाटील, कृषी महाविद्यालय अंबाजोगाई चे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. संजीव बंटेवाड, विस्तार कृषीवेत्ता डॉ. वसंत सूर्यवंशी, माहिती तंत्रज्ञान अभ्यासक पुणे मंदार कुलकर्णी, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील संलग्न विभागाचे प्रमुख व प्रयोगशील महिला व पुरुष शेतकरी यांची बैठकीला उपस्थिती होती. ऑनलाईन माध्यमातून माजी संचालक (शिक्षण) वनामकृवि परभणी डॉ. उदय खोडके, कृषी विद्यालय बदनापूर येथून डॉ. प्रल्हाद जायभाये सहभागी झाले होते. डॉ. देशमुख यांनी कृषी विज्ञान ◂◂ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार, दि.२२ फेब्रुवारी २०२५ । पान ७

# अमित शाह पुण्यात दाखल, २ दिवसांचा दौरा;

## पुणेकरांसाठी वाहतुकीत बदल, जड वाहनांना २४ तास प्रवेश बंद

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसीय पुणे (झींपश) दौऱ्यावर असून ते पुण्यात पोहोचले. यावेळी, केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ आणि मंत्री चंद्रकांत पाटील हे त्यांच्या स्वागताला विमानतळावर पोहोचले होते. दोन दिवसीय अमित शहा यांचा पुणे दौरा असून आज कोरेगाव पार्क येथील वेस्टिन हॉटेलमध्ये त्यांचा मुक्काम आहे. सकाळी ११ वाजता अमित शहांच्या उपस्थितीत पश्चिम गृह विभागाची बैठक होणार आहे. तसेच हडपसर येथील विठ्ठल तुपे सभागृहात दुपारी तीन वाजता जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या समारोपाला देखील सहकारमंत्री म्हणून अमित शहा (-ाळीं िहरह) उपस्थित राहणार आहेत. गृहमंत्र्यांच्या या पुणे दौऱ्याच्या निमित्ताने पुणे शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आल्याची माहिती पुणे वाहतूक पोलीस शाखेकडून देण्यात आली आहे.

गृहमंत्री अमित शाह पुण्यातील हॉटेल वेस्टीन येथे पोहोचले असून उद्या बालेवाडी येथे प्रधानमंत्री आवास योजना दुसऱ्या टप्प्यात २० लाख लाभार्थ्यांना घरकुलांचे मंजुरीपत्र वाटप अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. अमित शहांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर हॉटेल वेस्टीन बाहेर आज रात्रीपासूनच मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच, पुण्यातील वाहतुकीत देखील बदल करण्यात आला आहे. त्यामुळे, नेहमीच वाहतूक समस्येचा सामना करावा लागणाऱ्या पुणेकरांना आता वाहतूकही पुढील २४ तासांसाठी बदल करून पुढे जावे लागणार आहे.



गृहमंत्र्याचा दौरा, पुण्यातील वाहतुकीत बदल

१) विद्यापीठ चौकाकडून बाणेर रोडने राधा चौकाकडे जाणाऱ्या वाहनांनी गणराज चौकामधून डावीकडे वळून किया शोरूम अंडरपास किंवा ननावरे अंडरपास मार्गे जावे. २) मुंबई-बंगळुरू बायपासवरून बाणेर रोडवर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांनी बालेवाडी जकात नाका येथून डावीकडे वळण घेऊन हायस्ट्रिट मार्गे गणराज चौकातून इच्छितस्थळी जावे. ३) पुणे शहरातून हिंजवडी, वाकड, लोणावळा, मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी पुणे विद्यापीठ चौकातून बाणेर रोडमार्गे न जाता पाषाण रोडवरून चांदणी चौकमार्गे जावे अथवा पुणे विद्यापीठ चौकातून औंध रोड मार्गे जावे.

जड, अवजड वाहनांना बंदी...

१) पुणे विद्यापीठ चौक ते चांदणी चौक- पाषाण रोड

२) पुणे विद्यापीठ चौक ते राधा चौक- बाणेर रोड

३) पुणे विद्यापीठ चौक ते राजीव गांधी पूल - औंध रोड या रस्त्यावर सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना शनिवारी मध्यरात्री १२ ते रविवारी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत प्रवेश बंद राहणार

जड वाहनांना शहरात २४ तास बंदी

शनिवार (दि. २२) मध्यरात्री १२ ते रविवार मध्यरात्री १२ वाजेपर्यंत शहरात सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना तसेच मिक्सर, डंपर, हायवा व स्लो मूव्हिंग (जेसीबी, रोड रोलर) वाहनांना सर्व रस्त्यांवर बंदी घालण्यात आली

## रांजणगावात अवतरला बोगस अन्न औषध प्रशासन अधिकारी

शिक्रापूर । प्रतिनिधी

रांजणगाव गणपती ता. शिरूर येथील हॉटेल व्यवसायिकांना अन्न औषध प्रशासनअधिकारी असल्याचे भासवून त्यांच्याकडे पैशांची मागणी करणाऱ्या तोतया अन्न औषध प्रशासन अधिकाऱ्याला रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून उगमाराम खानुराम असे पोलिसांनी अटक केलेल्या तोतया अधिकाऱ्याचे नाव आहे.


रांजणगाव गणपती ता. शिरूर येथील मंगलाराम देवासी यांच्या न्यू चामुंडा स्वीट होम तसेच ठाकूर देवासी यांच्या चामुंडा स्वीट होम येथे आणि सोनेसांगवी रोड येथील अमित देवासी यांच्या जय भवानी स्वीट होम येथे एक इसम आला. त्याने प्रत्येक स्वीट होम मधून काही पदार्थ पार्सल घेतले त्यानंतर काही वेळाने तुमच्या पदार्थांमध्ये भेसळ आहे मी स्वतः अन्न औषध प्रशासन अधिकारी असल्याचे सांगत सर्वांना त्यांच्यावर कारवाई करण्याची भिती दाखवली.दरम्यान स्वीट होम चालकांना बाजूला घेत सदर प्रकरण येथेच मिटवून घेऊ असे सांगुन त्यांच्याकडे दहा हजार रुपयांची मागणी केली. यावेळी स्थानिकांना माहिती देत पोलिसांना बोलावून घेत सदर इसमाकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडावीची उत्तरे दिली. त्यावेळी सदर इसम हा बनावट व तोतयागिरी करणारा बोगस अन्न व औषध प्रशासन अधिकारी असल्याचे समोर आले. याबाबत मंगलाराम येना राम देवासी सध्या रा. रांजणगाव गणपती ता. शिरूर जि. पुणे मूळ रा. जिवंतकला ता. राणी जि. पाली राजस्थान यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी उगमाराम खानुराम रा. स्पाईन रोड चिंचवड चौक चिंचवड पुणे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यानंतर त्याला तातडीने अटक केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गुलाब येळे हे करत आहे.

## मंत्री महोदयांचे निकटवर्तीय सुरक्षित नाहीत, तर सर्वसामान्य जनतेचे काय ; सुप्रिया सुळेंचा सरकारला सवाल

**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात गुंड गजानन मारणे याच्या टोळीकडून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयातील एका व्यक्तीस बेदम मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली. गजा मारणेच्या टोळीकडून थेट केंद्रीय राज्यमंत्र्याच्या कार्यालयातीलच व्यकीला मारहाण करण्या इतपत आता मजल गेल्याने या घटनेवरून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी याविषयी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

पुणे शहरात गुडांनी उच्छाद मांडला असून या प्रकरणी मुख्यमंत्री महोदयांनी तातडीने लक्ष घालून शहराची कायदा सुव्यवस्था



रुळावर आणण्यासाठी प्रयत्न करावे, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळेंनी त्यांच्या एक्सवर पोस्ट केली आहे. पुणे शहरात केंद्रीय मंत्री महोदयांचे निकटवर्तीय देखील सुरक्षित नाहीत. कुख्यात गुंडाने पुण्यातील केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या स्टाफमधील काही कर्मचाऱ्यांवर हल्ला करून जखमी केले. केंद्रीय मंत्रीमहोदयांची ही अवस्था तर सर्वसामान्य जनतेचे काय हा प्रश्न आता उपस्थित झाला असल्याचे सुळे म्हणाल्या.

तसेच गेली काही दिवस पुण्यात गुंडांनी उच्छाद मांडला आहे. भररस्त्यतात रिव्हॉल्व्हर काढणे, हाणामारी प्रकार नेहमीच घडताना दिसत आहेत. मुख्यमंत्री महोदयांनी यात तातडीने लक्ष घालून शहराची कायदे सुव्यवस्था रुळावर आणण्यासाठी प्रयत्न करावे, असे म्हटले आहे.

कुख्यात गुंड गजानन मारणे याच्या टोळीकडून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयातील एका व्यक्तीस बेदम मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. गजा मारणेच्या टोळीकडून थेट केंद्रीय राज्यमंत्र्याच्या कार्यालयातीलच व्यकीला मारहाण करण्यात इतपत आता मजल वाढल्याचे या घटनेवरून दिसत आहे. या घटनेमुळे पुणे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. या घटनेचा पुढील तपास पुणे पोलीस करत आहे.

## सायबर चोरट्यांकडून तिघांची फसवणूक; तब्बल ८३ लाखांना घातला गंडा

पुणे । प्रतिनिधी

पुणे : राज्यात फसवणूकीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शेअर बाजारात गुंतवणुक तसेच ऑनलाइन टास्कच्या आमिषाने तिघांची सायबर चोरट्यांनी ८३ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.



वानवडी पोलिसांत ६७ वर्षीय ज्येष्ठ महिलेने तक्रार दिली आहे. सायबर चोरट्यांनी महिलेला शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला नफा देण्याच्या आमिषाने २८ लाखाला गंडा घातला आहे. नोव्हेंबर २०२४ ते फेब्रवारी २०२५ कालावधीत ही फसवणूक झाली आहे. चोरट्यांनी त्यांना गुंतवणूकीवर चांगला परतावा मिळेल, असे सांगितले. नंतर महिलेला एका बँक खात्यात पैसे भरण्यास भाग पाडले. पैसे भरल्यानंतर परतावा म्हणून त्यांना काही रक्कम देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. महिलेने या विश्वासाने ३ महिन्यात वेळोवेळी २८ लाख २० हजार रुपये जमा केले. रक्कम भरतानाच महिलेने संपर्क करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांना परतावा देण्याची मागणी केली. तेव्हा चोरट्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यावेळी महिलेला फसवणूक होत असल्याचे लक्षात आले. बिबवेवाडी परिसरातील एका नागरिकाची देखील सायबर चोरट्यांनी अशाच पद्धतीने शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने २५ लाख २० हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत बिबवेवाडी पोलिसांत ५४ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर साळुंखे तपास करत आहेत. कोथरूड भागातील एका नोकरदार व्यक्तीला सायबर चोरट्यांनी टास्क तसेच युट्यूबला लाईक्स मिळवून देण्यासाठी तसेच ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी (ऑनलाइन टास्क) असल्याच्या आमिषाने २९ लाख ६३ हजार रुपयांना गंडा घातला आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांवर कोथरुड पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत ५३ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने तपास करत आहेत.

## बँक मॅनेजरकडून महिलेची ९४ लाखांची फसवणूक

कोरेगाव । प्रतिनिधी

कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या असिस्टंट एरिया मॅनेजरने खातेदार महिलेचा चेक घेऊन पैसे बँकेच्या खात्यात वर्ग न भरता स्वतः सह पत्नी व मैत्रिणीच्या खात्यात वर्ग करुन महिलेला बनावट पावत्या दिल्याची घटना घडली आहे. यामध्ये महिलेची तब्बल ९३ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली. शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे स्टेट बँक ऑफ इंडियाचा कोरेगाव भीमा शाखेतील असिस्टंट एरिया मॅनेजर विकास गुलाब बेलदार याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चाळकवाडी येथे अपघातात दोघांचा मृत्यू

पिंपळवंडी - चाळकवाडी येथे पुणे नाशिक महामार्गावर गुरुवारी (ता. २०) रात्री साडेअकराच्या सुमारास झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. पिंटू लालू मेंगाळ (वय-३७) व प्रफुल्ल मिलिंद इंगळे (वय-१७) हे दोघे या अपघातात मृत्युमुखी पडले.

पिंटू मेंगाळ सध्या राहणार साबळे मळा, आळे, मूळ मोरोशी, ता. मुरबाड, जि. ठाणे व प्रफुल्ल इंगळे सध्या राहणार आळेफाटा, वडगाव आनंद, मुळ राहणार मोहला, ता. अकोट, जि. अकोला. हे दोघे ओझर येथील गणपती दर्शन करून त्यांच्या स्प्लेंडर या दुचाकीवरून आळेफाटा दिशेने येत असताना चाळकवाडी येथील चारंगबाबा हॉटेलच्या पाठीमागे रस्त्याच्या कडेला असलेल्या सिमेंट ब्लॉकला धडकले.




यात दोघांनाही गंभीर दुखापत झाली.दोघांनाही आळेफाटा येथील दवाखान्यात नेले असता त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सदरच्या अपघाताची माहिती चारंगबाबा हॉटेलचे मालक ऋषिकेश झिंझाड यांनी समाधान हॉटेलचे मालक रामदास गडगे यांना दिली.

रामदास अशोक गडगे यांचे आळेफाटा बस स्थानकाजवळ समाधान हे हॉटेल असून त्यांनी दोन वर्षां पुर्वी पिंटू इंगळे यांना नाश्ता सेंटर भाडेतत्वावर चालविण्यासाठी दिले होते तसेच प्रफुल्ल इंगळे हा तिथे वेटर म्हणुन काम करत होता.

पिंटू मेंगाळ हे दुचाकी चालवत होते तसेच त्यांच्या मागे बसलेला प्रफुल्ल इंगळे या दोघांचाही या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. भरधाव वेगाने दुचाकी चालवील्याने हा अपघात घडला असुन रामदास गडगे यांनी आळेफाटा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पुढील तपास आळेफाटा पोलीस करत आहेत.

## गजा मारणे टोळीतील तिघांना पोलीस कोठडी

**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात गुंड गजानन मारणे याच्या मंडळाने काढलेल्या मिरवणूकीत निरपराध तरुणाला मारहाण प्रकरणात तिघांना न्यायालयाने २४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. एच. वानखेडे यांनी हे आदेश दिले आहेत. दरम्यान, माध्यमांत बातम्या अन् केंद्रीय मंत्र्यांनी लक्ष घातल्यानंतर पोलिसांनी धावपळ करत खूनाचा प्रयत्न केल्याचे कलम लावले. दुसरीकडे गुंडाची खैर नाही असे पोलीस आयुक्त सांगत असताना याप्रकरणाची गुप्तता पाळण्यात आल्याने नेमके प्रकरण इतक्या गुप्ततेने का हातळले गेले असा प्रश्न सर्व सामान्यांना पडला आहे.

ओम तिर्थराम धर्मजिज्ञासू (वय ३५,रा. शिंदे चाळ, शास्त्रीनगर, कोथरुड), किरण कोंडिबा पडवळ (वय ३१, रा. शेख चाळ, शास्त्रीनगर, कोथरुड), अमोल विनायक तापकीर (वय ३५, रा. लालाबहादूर शास्त्री कॉलनी, शास्त्रीनगर, कोथरुड) अशी अटक व पोलीस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. त्यांचा एक साथीदार पसार आहे. हा प्रकार कोथरुडमधील भेलकेनगर चौकात १९ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास घडला होता. याबाबत देवेंद्र जोग याने कोथरूड पोलिसांत तक्रार दिली आहे. जोग हा आयटी कंपनीत नोकरीला आहे. तो घटनेच्या दिवशी दुचाकीवरुन जात होता. तेव्हा गजानन मारणे मंडळाने शिवजयंतीची मिरवणूक सुरू होती. मिरवणूकीच्या समोरून तो दुचाकीने निघाला होता. त्याने हॉर्न वाजविल्यानंतर चौघांनी त्याला अडविले. त्यांना मिरवणूकीत गाडी घातल्याचा राग आला. त्यांनी काय रे गाडी हळु चालविता येत नाही.धक्का मारतो का, असे म्हणत वाद घालण्यास सुरूवात केली. तरीही जोग म्हणाला दादा मी तुम्हाला धक्का दिला नाही. परंतु, इतरांनी त्याला थेट मारहाण करण्यास सुरूवात केली. तोंडावर व नाकावर मारहाण झाल्याने त्याच्या नाकातून रक्तस्त्राव होऊ लागला.

## मांजरीत स्पिकर्स बनविणाऱ्या कारखान्याला भीषण आग, कारखाना जळून खाक

पुणे । प्रतिनिधी

पुणे : हडपसर भागातील मांजरी येथील मोकळ्या जागेत शेडमध्ये उभारण्यात आलेल्या स्पीकर्स बनविणाऱ्या कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना पहाटे घडली आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जिवीतहानी झाली नाही. मात्र, कारखाना या आगीत जळून खाक झाल्याची माहिती अग्निशमन दलाने दिली आहे. याप्रकरणी हडपसर पोलिसांत घटनेची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मांजरी खुर्द येथे मोकळ्या जागेत जवळपास ६ हजार स्केवअर फुटामध्ये पत्रे व लोखंडी अँगलने कारखाना उभा केला होता. याठिकाणी मोठ- मोठे स्पीकर बनविण्यात येत होते. शुक्रवारी पहाटे साडेचारच्या सुमारास अचानक कारखान्यातून धूर येत असल्याचे निदर्शनास आले. तत्काळ ही माहिती येथील नागरिकांनी अग्निशमन दल व पोलिसांना दिली. लागलीच पुणे पीएमआरडीए अग्निशमन दलाचे चार फायर बंब व पाण्याचे टँकर दाखल झाले. तोपर्यंत आगीने उग्ररूप धारण केले होते. पुर्ण कारखान्याला आगीने विळखा घातलेला होता. आग मोठ्या प्रमाणात पसरलेली होती. जवानांनी चारही बाजूने पाण्याचा मारा सुरू केला. पण, स्पीकर्ससाठी लागणारे प्लाऊड तसेच जाळी व इतर प्लास्टीक वस्तू असल्याने आग भडकलेली होती. जवानांनी अर्धा ते पाऊन तास अथक पाण्याचा मारा करून ही आग आटोक्यात आणली. तरीही जळत्या लाकडाचे निखारे निघत होते. जवानांनी पाण्याचा मारा करून कुलिंग ऑपरेशन सुरू केले. दरम्यान आगीत कोणी कामगार अडकले आहे का याची खात्री केली. जेसीबीच्या साह्याने शेडलगत असणारे पत्रे बाजूला करुन जवानांनी आत प्रवेश केला. पाहणी केली असता त्यात कोणीही अडकलेले नसल्याचे दिसून आले. दरम्यान, या आगीत संपुर्ण कारखाना जळाला, असल्याचे सांगण्यात आले. आगीत सीएनसी मशीन्स, कटींग मशीन, स्पीकर, एम्लिफायर्स, प्लॉयवुड, रंगाचे डबे, फायबर साहित्य, फर्निचर, इलेक्ट्रीक वायरिंग असे साहित्य जळाले. या आगीचे कारण समजू शकले नाही.

## मला पैसे दे नाहीतर, संतप्त प्रियकराने केली प्रेयसीची हत्या, शिर धडावेगळे करून प्रियकर पोलिसात हजर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातून फिरण्यासाठी गेलेल्या जोडप्यामध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला, त्यानंतर चिडलेल्या प्रियकराने प्रेयसीच्या डोक्यावर चाकूने वार केल्याने शीर धडवेगळ झाल्याची धक्कादायक घटना समोर आली. पुणे जिल्ह्यातून आलेल्या प्रेमीयुगुलापैकी प्रेयसीने पैसे मागितल्याच्या रागातून प्रियकराने कोयत्याने वार केला, त्यानंतर तिचे शीर धडावेगळे झाले.

पुणे जिल्ह्यातील वांबोरी परिसरातील विळद रोडवरील पिलेश्वर देवस्थान परिसरात असलेल्या गणपती मंदिरात जवळ ही घटना बुधवारी (२१ फेब्रुवारी २०२५) घडली. मृत महिलेचे नाव सोनाली राजू जाधव (वय २८, रा. पोखरी, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे) असे आहे. हत्येनंतर आरोपी सखाराम धोंडिबा वाळकोली (वय ५८, रा. निडगुरसर, तहसील आंबेगाव, जिल्हा पुणे) याने स्वत: हून पोलिसांसमोर जाऊन हत्येची माहिती दिली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेबाबत पोलीस हेड कॉन्स्टेबल सुनील निकम यांच्या फिर्यादीविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सखाराम




बुधवारी (दि. १९) संध्याकाळी सातच्या सुमारास वांबोरी परिसरातील पिलेश्वर देवस्थान मंदिर परिसरात गेले होते. प्रेयसी सोनाली आरोपी सखारामकडे पैशाची मागणी करू लागली. त्यावरून सोनाली आणि सखाराम यांच्यात वाद झाला. त्यानंतर सखारामने सोनलीच्या मानेवर कोयत्याने वार केला. यामध्ये जागीच तिचा मृत्यू झाला. कोयत्याचा प्रहार इतका जोरदार होता की सोनालीचे शीर धडावेगळे झाले. त्यानंतर आरोपी सखाराम वार केलेला कोयता घेऊन जवळपास चार किलोमीटर चालत रात्री दहाच्या सुमारस वांबोरी पोलिस ठाण्यात पोहोचला. तेथे त्याने स्वतःच फोन करून पोलिसांना बोलावून घेतले. 'मी माझी प्रेयसी सोनालीला ठार मारले आहे,' असं त्याने पोलिसांना सांगितलं. पोलिसांनी सोनालीचा मृतदेह पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास वांबोरी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला. तेथून उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेमुळे वांबोरी परिसरात एकच खळबळ उडाली. बाहेरगावावरून आरोपी त्या ठिकाणी का आला होता? त्याने आपल्या प्रेयसीची हत्या नेमकी कोणत्या कारणावरून केली? फक्त पैशावरून वाद होता का? तो वांबोरीपर्यंत कोणत्या वाहनाने आला? याचा तपास पोलिस करत आहेत.

## समाविष्ट गावांना शुध्द पाणीपुरवठ्यासाठी ५०० कोटी; उशिरा का होईना शासनाला जाग

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे: सिंहगड रस्ता परिसरात आतापर्यंत ५ जणांचा जीबीएसमुळे मृत्यू झाला आहे. उशिरा का होईना शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी शासनाने पावले उचलल्याने जीव गेल्यावर सरकार हलल्याची प्रचिती येत आहे. दूषित पाणीपुरवठ्यामुळे सिंहगड रस्ता परिसरातील पाच ते सहा गावांमध्ये गुलेन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) आजाराची साथ पसरली. त्यामुळे या गावांना होणार्या अशुध्द पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री अजित पवार यांनी सिंहगड रस्ता परिसरातील समाविष्ट गावांना शुध्द पाणीपुरवठा करण्यासाठी ५०० कोटी रुपये खर्चाच्या योजनेला मंजुरी दिल्याचे जाहीर केले आहे. या योजनेनुसार राज्य शासन व महापालिका प्रत्येकी ५० टक्के खर्च करणार आहे.

पालकमंत्री पवार यांच्या घोषनेनंतर महापालिकेने तत्काळ समाविष्ट १२ गावांच्या पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव राज्य शासनाला सादर केला आहे. त्यानुसार संबंधित १२ गावांची लोकसंख्या आणि पाण्याची मागणी यानुसार ८९० कोटींचा योजना आराखडा तयार केला आहे.

महापालिकेने १२ गावांच्या पाणीपुरवठा योजनेसाठी केलेल्या प्रकल्प आराखड्यानुसार



खडकवासला धरणाच्या पायथ्याशी १०० एमएलडीचे प्रत्येकी दोन जलशुद्धीकरण केंद्र, पंपहाऊस व जॅकवेल बांधण्यात येणार आहेत. त्याचबरोबर शुद्ध व अशुद्ध पंपिंग मशिन तसेच मुख्य जलवाहिन्या व वितरण वाहिन्या टाकण्यात येणार आहेत. जलशुद्धीकरण केंद्रासह जॅकवेल, पंपहाऊससाठी ११ एकर जागेची आवश्यकता लागणार आहे. या भागात पाटबंधारे विभागाची जागा असून, महापालिकेने त्या जागेची मागणी केली आहे. तसेच ५ पंप हाऊस व ४२ टाक्यांच्या जागांपैकी टप्पा १ मध्ये ५ पंपहाऊस व ३३ टाक्यांचा समावेश आहे. उर्वरित ९ टाक्या टप्पा २ मध्ये आहेत. त्यासाठी महापालिकेकडे २० जागा उपलब्ध असून, १८ जागांसाठी टप्पा १ मध्ये भूसंपादन करण्यात येणार आहे. दरम्यान, टप्पा एक मध्ये भूसंपादन व देखभाल दुरुस्तीची कामे वगळून उर्वरित आवश्यक कामांसाठी ६०६ कोटी लागणार आहेत, तर टप्पा दोनमध्ये २८४ कोटींची आवश्यकता लागणार आहे.

योजनेतील १२ गावांची २०२४ पर्यंतची अंदाजित लोकसंख्या ३ लाख ४८ हजार ५५८ इतकी आहे. त्यासाठी ६६.१० एमएलडी इतकी पाण्याची मागणी आहे. या गावांची २०२५ पर्यंतची अंदाजित लोकसंख्या ७ लाख ६० हजार ६६३ इतकी असेल, त्यासाठी १५१.७ एमएलडी इतकी पाण्याची आवश्यकता असेल.